




पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला • वर्ष १६ • अंक ३ • गुरूवार, दि. ९ जुलै २०२६ • मूल्य ५ • पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 | Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 | Web. http://epaper:citynewssuperfast.com







## » थोडक्यात

### पालख्यांच्या स्वागताला वरुण राजाची हजेरी !

**पुणे** : 'साधू-संत येती घरा, तोचि दिवाळी दसरा...' या संत तुकारामांच्या अभंगानुसार गुरुवारी जगद्गुरू संत तुकाराम महाराज आणि संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्यांचे पुण्यनगरीत आगमन होताना, पालख्यांवर वरुणराजाकडून जलाभिषेक होणार आहे. गेल्या आठवडाभरापासून सुरू असलेल्या पावसाचा जोर काहीसा ओसरला असला तरी पुढील दोन दिवस पुण्यात हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याचा अंदाज वेधशाळेने वर्तविला आहे.

### भूकंपामुळे हिंगोलीकर भयभीत!

**हिंगोली** : मराठवाडा पुन्हा एकदा भूकंपाने हादरला आहे. परभणी, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यांना मध्यरात्री सलग चार वेळा भूकंपाचे धक्के बसले. सर्वात मोठ्या धक्क्याची तीव्रता ४.६ रिश्टर स्केल इतकी नोंदवली गेली. सुदैवाने जीवितहानी झाली नसली तरी अनेक घरांच्या भिंतींना तडे गेले असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. प्रशासनाने नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवता सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. हिंगोली जिल्ह्यांमध्ये रात्री दोन तासांमध्ये चार भूकंपाचे धक्के जाणवले आहेत ४.६ रिस्टर स्केल हा भूकंप सर्वात जास्त तीव्र समजला जात आहे. या भूकंपाचे सर्वात जास्त हादरे तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये बसले आहेत. परिणामी अनेकांच्या घरांच्या भिंती कोसळल्या आहेत तर काहींच्या घरांना तडे गेले आहेत.

## शरद पवार-शिंदे भेटीनंतर सुनेत्रा पवार थेट फडणवीसांच्या भेटीला

# महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा भूकंप होणार ?

प्रतिनिधी | ९ जुलै

मुंबई : महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या दोन दिवसांत घडलेल्या सलग भेटींमुळे नव्या राजकीय चर्चांना उधाण आले आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी विधानभवनात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दालनात जाऊन भेट घेतल्यानंतर आता उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याने विविध तर्क-वितर्कांना पुन्हा एकदा वेग आला आहे.

मात्र, या दोन्ही भेटींच्या राजकीय आशयाबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नसल्याने सध्या सुरू असलेल्या चर्चांना अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नावरील उच्चाधिकार समितीच्या बैठकीसाठी शरद पवार विधानभवनात आले होते. बैठक संपल्यानंतर त्यांनी थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दालनात जाऊन भेट घेतली. त्या वेळी शिंदे मंत्रिमंडळाच्या बैठकीत सहभागी होते. मात्र, पवार दालनात आल्याची माहिती मिळताच त्यांनी कॅबिनेट बैठक काही काळासाठी सोडून त्यांची भेट घेतली आणि शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला. यानंतर शरद पवार यांनी त्याच दालनात आपल्या पक्षाच्या आमदारांशी काही काळ चर्चा केली. या संपूर्ण घडामोडींचे फोटो आणि व्हिडिओ समोर आल्यानंतर राजकीय वर्तुळात विविध चर्चांना सुरुवात झाली. या सर्व घडामोडींनंतर आता उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. ही भेट नेमक्या कोणत्या कारणासाठी झाली, याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नाही. मात्र, शरद पवार-शिंदे भेटीनंतर लगेचच ही भेट झाल्याने तिची राजकीय चर्चा सुरू झाली आहे.





### केंद्रीय मंत्रिमंडळ विस्ताराच्याही चर्चा

» याच काळात केंद्र सरकारच्या संभाव्य मंत्रिमंडळ विस्ताराच्या चर्चाही सुरू आहेत. महाराष्ट्रातील काही खासदारांना मंत्रिमंडळात संधी मिळू शकते, अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे. त्यामुळे राज्यातील विविध पक्षांमधील भेटीगाठी आणि संवादाकडे अधिक बारकाईने पाहिले जात आहे. शरद पवार-एकनाथ शिंदे भेट असो किंवा सुनेत्रा पवार-देवेंद्र फडणवीस यांची भेट, या दोन्ही भेटींमागे कोणताही राजकीय संदेश किंवा नवीन समीकरण असल्याचे अधिकृतरीत्या कोणत्याही पक्षाने स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या सर्व चर्चा या राजकीय विश्लेषण आणि तर्क-वितर्कांच्या पातळीवर असून, आगामी काळातील घडामोडींवरच या भेटींचा नेमका अर्थ स्पष्ट होणार आहे.

### शरद पवार-शिंदे भेटीने मविआत ठिणगी

» दुसरीकडे, शरद पवार यांनी विधानभवनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दालनात जाऊन आपल्या आमदारांची बैठक घेतली. पवार दालनात आल्याचे समजताच शिंदेंनी आपली कॅबिनेट बैठक सोडून त्यांचे स्वागत केले. या भेटीचे फोटो आणि व्हिडिओ समोर आल्यानंतर महाविकास आघाडीत मोठी बिघाडी झाल्याचे चित्र आहे. शिवसेना (ठाकरे गट) नेते संजय राऊत यांनी यावर उघडपणे नाराजी व्यक्त करत, 'पवारांनी शिंदेंच्या दालनात जाणे योग्य नव्हते' असे सुनावले आहे. महाविकास आघाडीतील हा वाढता दुरावा सत्ताधाऱ्यांच्या पथ्यावर पडण्याची शक्यता आहे.

### ठाकरे गटाला धक्के; 'मातोश्री'वर धाकधूक

» मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाविकास आघाडीला खिंडार पाडण्याचे 'ऑपरेशन' अधिक आक्रमक केले आहे. ठाकरे गटाचे तब्बल ६ खासदार शिंदेंनी फोडल्याची चर्चा आहे. तसेच, सचिन अहिर यांच्यासारख्या नेत्यांना विधान परिषदेचे उपसभापतिपद देऊन सत्ताधाऱ्यांनी विरोधकांना मोठा धक्का देण्याची रणनीती अवलंबली आहे. पक्षातील आमदार आणि खासदार फुटण्याच्या वाढत्या चर्चांमुळे उद्धव ठाकरे अलर्ट मोडवर आले आहेत. त्यांनी 'मातोश्री'वर आमदारांची तातडीची बैठक बोलावून डॅमेज कंट्रोल करण्याचा प्रयत्न केला आहे.

## परिवहनमधील भ्रष्टाचारी सक्तीच्या रजेवर!

प्रतिनिधी | ९ जुलै

मुंबई : विधानसभेत काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी परिवहन विभागातील कथित भ्रष्टाचार आणि गैरव्यवहाराचा मुद्दा उपस्थित करत संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याची जोरदार मागणी केली.

वडेट्टीवार यांनी सभागृहात सांगितले की, परिवहन खात्यात चौकशी सुरू असतानाही संबंधित अधिकारी पुन्हा त्याच प्रकारचे धंदे सुरू करत असल्याच्या गंभीर तक्रारी समोर येत आहेत. त्यामुळे या अधिकाऱ्यांची तात्काळ बदली करण्यात यावी आणि त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवावे, अशी मागणी त्यांनी केली. त्यानंतर परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी या अधिकाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्याची घोषणा केली. यावर उत्तर देताना परिवहन मंत्र्यांनी सांगितले की,आरटीओ विभागातील कथित गैरव्यवहारांप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेमार्फत चौकशी सुरू आहे. रविंद्र भुयार प्रादेशिक परिवहन अधिकारी योगेश मोरे आणि आनंद मोड मोटार वाहन निरीक्षक यांच्याविरोधातील आरोपांची गंभीर दखल घेण्यात आली असून, या अधिकाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्याची घोषणा केली.

## शरद पवार गद्दारांना प्रतिष्ठा देत आहेत: संजय राऊत

प्रतिनिधी | ९ जुलै

**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार विधान भवनात गेले होते. त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या दालनात राष्ट्रवादी काँग्रेसची बैठक घेतली. ज्यावरुन संजय राऊत चांगलेच संतापले आहेत. शिवसेनेचे मन शरद पवारांच्या कृतीमुळे दुखावले आहे. शरद पवारांनी गद्दारांना प्रतिष्ठा देऊ नये, असेही खा. संजय राऊत यांनी म्हटलं आहे.

शरद पवार हे नक्कीच मोठे नेते आहेत. आदरणीय आहेत, पण ज्या गद्दाराने आपलं सरकार पाडलं त्या गद्दाराच्या छताखाली घेऊन बैठका घेणं अशामुळे मोठ्या नेत्याची विश्वासार्हता कमी होते आणि घसरते. शरद पवार हे मोठे नेते आहेत, पण ज्या एकनाथ शिंदेंनी महाराष्ट्राला गद्दारी



आणि भ्रष्टाचारी कीड लावली त्यांच्या दालनात जाऊन शरद पवारांनी बैठक का घेतली? संपूर्ण विधान भवन काय ओस पडलं होतं का? वाय. बी. चव्हाण प्रतिष्ठान आहे. हे आमचं म्हणजेच निष्ठावंत कार्यकर्त्यांचं मत आहे. आम्ही कधीही गद्दारांच्या दालनात जाऊन आमच्या पक्षाची बैठक घेणार नाही. आम्ही इतके सहिष्णू नाही, आमचं मन इतकं मोठं नाही. ज्यांचं मन मोठं आहे त्यांनी ते करावं पण आम्हाला ते मान्य नाही. ज्यांना पटत असेल त्यांनी ते करावं. यामुळेच राष्ट्रवादी काँग्रेसची विश्वासार्हता कमी होते असं संजय राऊत यांनी म्हटलं आहे.

## मोशी दुर्घटना: 9 जणांना काढले सुखरूप बाहेर!

### अद्यापही ७-८ जण इमारतीखाली अडकल्याची शक्यता

प्रतिनिधी | ९ जुलै

**पिंपरी** : एनडीआरएफचे जवान ढिगाऱ्याखाली अडकलेल्या व्यक्तींना बाहेर काढण्यात सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. आतापर्यंत आम्ही ९ जणांना सुखरूप बाहेर काढले आहे. एका पिलरखालून एका गंभीर जखमी व्यक्तीला बाहेर काढण्यात यश आले आहे. अजूनही ७, ८ जण इमारतीखाली अडकले आहेत. सर्व जिवंत असतील अशी आशा आहे. लवकरच आम्ही हे रेस्क्यू ऑपरेशन पूर्ण करू, असे आश्वासन एनडीआरएफने माध्यमांशी बोलताना दिले आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मोशी येथील घनकचरा व्यवस्थापन केंद्रात बुधवारी (दि. ८ जुलै) दुपारी दीड वाजताच्या सुमारास भीषण दुर्घटना घडली. 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीवर हजारो टन कचऱ्याचा डोंगर अचानक कोसळल्याने दुमजली इमारत क्षणार्धात कोसळली. इमारतीला हजारो टन कचऱ्याच्या मलब्याचा विळखा पडला. या दुर्घटनेत इमारतीमध्ये २३ कर्मचारी अडकल्याची माहिती असून, त्यापैकी पाच जण स्वतः बाहेर पडले, तर बचाव पथकांनी एक महिलेसह सहा जणांना सुखरूप बाहेर काढले. तिघांच्या पायांवर मलबा पडल्याने ते जखमी अवस्थेत अडकले असून, उर्वरित नऊ जणांशी रात्री उशिरापर्यंत संपर्क होऊ शकलेला नव्हता. मलबा खाली अडकलेल्या एकाला बाहेर काढण्यात आले आहे. त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



### अडकलेल्या व्यक्तींना इजा होऊ नये

» मोठी यंत्रे लावून इमारत बाजूला घेणे धोकादायक आहे. त्यामुळे संपूर्ण इमारत कोसळून अडकलेल्या व्यक्तींच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. म्हणून आम्ही ब्रोकलेनच्या साहाय्याने इमारतीच्या एका बाजूला भगदाड पाडले आहे. त्यामधून आमचे जवान आतमध्ये गेले आहेत. आत मोठ्या प्रमाणावर कचरा आहे. अडकलेल्या व्यक्तींना काही इजा होऊ नये, याद्दष्टीने प्रयत्न सुरु आहेत. तसेच त्यांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी जवान प्रयन्त करत असल्याचे एनडीआरएफने सांगितले आहे.

## राम मंदिर चोरी प्रकरण: अविनाश शुक्ला मुख्य आरोपी!

वृत्तसंस्था | ९ जुलै

अयोध्या : अयोध्येतील राम मंदिरातील दान अपहार प्रकरणात अविनाश शुक्ला हा मुख्य आरोपी असल्याचे विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) प्राथमिक अहवालात म्हटले आहे. त्याने सुमारे ४० दिवसांत ७० वेळा अपहार केल्याचे तपासात आढळल्याचे सूत्रांनी सांगितले.

मंदिरातील रोख दानाची मोजदाद करण्याचे काम अविनाश शुक्लाकडे होते. त्याच्याविरोधात सबळ पुरावे असून, 'एसआयटी'च्या प्राथमिक अहवालानुसार, तो मुख्य आरोपी आहे. श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाच्या सोमवारच्या बैठकीत तीन सदस्यीय 'एसआयटी'च्या प्राथमिक निष्कर्षाबाबत चर्चा झाली, असे मंदिराशी संबंधित सूत्रांनी सांगितले. मंदिराच्या दान-देणगी मोजदाद कक्षातून ४० दिवसांत ७० वेळा अपहार करण्यात आल्याचे 'एसआयटी'ला प्रथमदर्शनी आढळले आहे. शुक्ला हा देणगीच्या रक्कमेतून नोटा, नोटांची बंडले काढून लपवत असल्याचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांतून दिसून आले आहे. सीसीटीव्ही फुटेज, जप्त केलेली रक्कम, बँक खात्यांचे विश्लेषण आणि साक्षीदारांच्या जबाबातून मिळालेल्या माहितीच्या आधारे शुक्ला याच्याविरोधात सबळ पुरावे जमा करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. अनुकल्प मिश्रा, लवकुश मिश्रा, करूणेश पांडे हे शुक्ला याला दानचोरीत मदत करीत असल्याचे सीसीटीव्ही फुटेजवरून दिसत असल्याचेही सांगण्यात आले.

### कॉल रेकॉर्डिंग काढली तर....

» अयोध्येतील राम मंदिरात भाविकांनी दिलेल्या देणग्या आणि दागदागिन्यांच्या झालेल्या अफरातफरीमुळे सध्या मोठी खळबळ उडालेली आहे. या प्रकरणी काही जणांना अटक करण्यात आली असून, एसआयटीमार्फत संपूर्ण प्रकरणाची चौकशी सुरू आहे. यादरम्यान, समाजवादी पार्टीचे प्रमुख अखिलेश यादव यांनी राम मंदिरातील देणग्यांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत मोठा दावा केला आहे. देणग्या चोरणाऱ्यांची कॉल रेकॉर्डिंग तपासली तर त्यामधील ९९ टक्के लोक हे भाजपावाले असतील, असा दावा अखिलेश यादव यांनी केला.

### तीन आरोपींची चौकशी

» राम मंदिरातील कथित दान अपहारप्रकरणी तीन आरोपींना न्यायालयाने पोलिस कोठडी दिली आहे. त्यानुसार, अनुकल्प मिश्रा, लवकुश मिश्रा आणि करुणेश पांडे यांना बुधवारी कोठडीत घेऊन यांची चौकशी केली. या तपासादरम्यान समोर आलेल्या नव्या पुराव्यांच्या आधारे या आरोपींची चौकशी सुरू असल्याचे सूत्रांनी सांगितले.

### गोपाल राव संकुलाबाहेर

» श्री राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे प्रशासक आणि विशेष निमंत्रित सदस्य गोपाल राव यांनी अयोध्येतील मंदिर संकुलातील निवासस्थान सोडले असून, ते आता कारसेवकपुरममध्ये वास्तव्यासाठी गेले असल्याचे सूत्रांनी सांगितले. राव यांनी बुधवारी न्यासाचे खजिनदार गोविंद देव गिरी यांची भेट घेतली. तसेच मंदिर संकुलाचा प्रवेश पास जमा केल्याचे समजते.



## मंत्रालयातून चक्रं फिरली, तरीही गावगुंड मोकाटच!

### शिवा'समोर तपास यंत्रणा नतमस्तक ? पातूरचे 'लोकल' आणि अकोल्याचे 'स्थानिक' थरथर कापले

प्रतिनिधी | ९ जुलै

**अकोला** : मुंबई-पुण्यातील थेट मंत्रालयाचे फोन खणखणतात, उपमुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातून आदेश सुटतात, तेव्हा कुठे अकोल्याच्या सुस्त तपास यंत्रणेला जाग येते ! पण एवढं सगळं होऊनही 'नंदकिशोर'च्या कथित गायब होण्यामागचं आणि त्या छळामागचं गूढ उकलण्याऐवजी तपास यंत्रणा ढिम्म बसून होती. पातूरात सध्या दहशतीचं आणि संशयाचं वातावरण आहे, ऊठसुठ प्रेस नोट काढणाऱ्या तपास यंत्रणेच्या तोंडाला कुलूप का ? कधी काळी तडीपार असलेला एक किरकोळ गुंड 'शिवा' आज इतका पावरफुल्ल झालाय की, त्याला पातुरचे 'लोकल' आणि अकोल्याची 'स्थानिक' तपास यंत्रणा थरथर कापत आहे ? अशी संतप्त चर्चा आता उघडपणे सुरू झाली आहे.




### मध्यरात्री नग्न अवस्थेत सोडले

» विश्वासू सूत्रांनी दिलेल्या धक्कादायक माहितीनुसार, नंदकिशोर नावाच्या एका वैद्यकिय व्यावसायिकाला शिर्ल्यातून अचानक गायब करण्यात आले. अत्यंत संतापजनक बाब म्हणजे, या नाट्यानंतर शिवा च्या अटीवर अत्यंत गंभीर आणि अर्धनग्न अवस्थेत रस्त्यावर सोडून देण्यात आले. पातूरात इतकं मोठं आणि अमानुष कृत्य घडतं, तरीही अकोल्यातील तपास यंत्रणा मूग गिळून का शांत आहे ? अकोल्यात तपास यंत्रणेचा धाक संपूर्णपणे संपला आहे का, असा थेट सवाल जनता विचारत आहे.

### हनीट्रॅप की खंडणी ?

» एका नामांकित डॉक्टरसोबत घडलेल्या या अघोरी घटनेमागे एखादी महिला, 'हनीट्रॅप' किंवा लाखोंच्या खंडणीचा वैयक्तिक वाद असण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. या संपूर्ण काळ्या कृत्यामागे 'शिवा' नावाच्या गावगुंडाचे कनेक्शन काय ? पातूरात काय गुन्हेगारांना उघडपणे लुटमारीचे आणि दहशत माजवण्याचे 'लायसन्स' दिले आहे का? या गावगुंड आणि खंडणीबहाद्दरांच्या डोक्यावर नेमका कोणाचा आशिर्वाद आहे, याचा जाब आता जनतेला हवा आहे.

### मंत्रालयाचा दबाव, तरीही यंत्रणा सुस्त ?

» सर्वात खळबळजनक आणि संताप आणणारी बाब म्हणजे, हे गंभीर प्रकरण स्थानिक पातळीवरच दाबून टाकण्याचा आणि आरोपींना वाचवण्याचा जोरदार प्रयत्न झाला. मात्र, पुणे आणि मुंबई येथून थेट 'उपमुख्यमंत्री कार्यालयाने' चाबूक फिरवल्यानंतर कुठे अकोल्याच्या स्थानिक यंत्रणेला जाग आली. वरिष्ठ पातळीवरून थेट आदेश आले असतानाही, 'शिवा'वर कारवाई करण्यास टाळाटाळ का करत आहेत ? त्याला कोणाचा वरदहस्त आहे ?, अशी विचारणा होत आहे.

## खडसे अन् तावडेंची गुप्त भेट!

### गिरीश महाजनांचा प्रभाव कमी करण्यासाठी केंद्राची खेळा

प्रतिनिधी | ९ जुलै

**मुंबई** : महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळातून एक अत्यंत खळबळजनक आणि मोठी बातमी समोर येत आहे. भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार गट ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांच्यात मुंबईत एक महत्त्वपूर्ण भेट झाली आहे. या भेटीमुळे राजकारणात विविध तर्क-वितर्कांना उधाण आले असून, एकनाथ खडसे पुन्हा एकदा भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चांनी प्रचंड जोर धरला आहे.


विशेष म्हणजे, या भेटीमागे उत्तर महाराष्ट्रातील भाजपचे संकटमोचक गिरीश महाजन यांचा प्रभाव कमी करण्याची दिल्लीची खेळी तर नाही ना, अशी नवी चर्चा आता सुरू झाली आहे. एकनाथ खडसे यांच्या भाजप प्रवेशाबाबत यापूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि जे. पी. नड्डा यांच्याशी सविस्तर चर्चा झाली होती. दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांचा या प्रवेशाला हिरवा कंदील असूनही, राज्यातील काही बड्या नेत्यांच्या विरोधामुळे हा प्रवेश रखडल्याचे बोलले जात होते. अशातच आता थेट दिल्लीतील वजनदार नेते विनोद तावडे यांनी खडसेंच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. जळगाव आणि उत्तर महाराष्ट्रात गिरीश महाजन यांचा वाढता प्रभाव कमी करण्यासाठी केंद्रीय नेतृत्वाने ही चाल खेळल्याची जोरदार चर्चा राजकीय विश्लेषकांमध्ये रंगली आहे. विनोद तावडे आणि खडसे यांच्या या भेटीमुळे भाजप आणि राष्ट्रवादी दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये सध्या मोठा संभ्रम निर्माण झाला आहे.

### भाजप प्रवेशाच्या चर्चांवर खडसेंचे स्पष्टीकरण

» या भेटीनंतर तर्क-वितर्क लढवले जात असतानाच, आमदार एकनाथ खडसे यांनी मात्र या सर्व चर्चांचे पूर्णपणे खंडन केले असून या केवळ अफवा असल्याचे म्हटले आहे. खडसे म्हणाले की, विनोद तावडे हे केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या मुंबईतील निवासस्थानी आले होते, त्यावेळी ही भेट झाली. ही कोणतीही राजकीय भेट नव्हती, तर केवळ माझ्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी घेतलेली ती एक सदिच्छा भेट होती.

## एक रूपयाने शेअर दलांनी केली होती सुरूवात

प्रेमचंद रॉयचंद हे व्यापारी 'द नेटीव शेअर ॲन्ड स्टॉक ब्रोकर्स'चे संस्थापक सदस्य होते. 'द नेटीव शेअर ॲन्ड स्टॉक ब्रोकर्स'ची सुरुवात २५ शेअर दलालांनी अवघ्या एका रुपयाने केली होती. ३१ ऑगस्ट १९५७ रोजी भारत सरकारने या बाजारास सिक्युरिटीज कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट १९५६ अन्वये मान्यता दिली. अशा तऱ्हेने भारतातील पहिला मान्यताप्राप्त शेअर बाजार अस्तित्वात आला. सध्या मुंबई शेअर बाजार हा जगातील ११ व्या क्रमांकाचा शेअर बाजार आहे



### असा आहे 'बीएसई'चा इतिहास

# एका वडाच्या झाडाखाली सुरु झाले होते मुंबई शेअर मार्केट !

मुंबई शेअर बाजार (बीएसई) ची सुरुवात खरोखरच १८५० च्या दशकात दक्षिण मुंबईतील टाउन हॉलजवळ एका वडाच्या झाडाखाली झाली होती. १८५० च्या दशकात काही गुजराती आणि एक पारशी असे एकूण ५ शेअर दलाल दररोज टाऊन हॉलसमोरील (आशियाटिक लायब्ररी) वडाच्या झाडाखाली एकत्र येऊन शेअर्सचे व्यवहार करत असत. पुढे व्यापाऱ्यांची संख्या वाढत गेल्यावर ९ जुलै १८७५ रोजी या दलालांनी एकत्र येऊन 'द नेटिव्ह शेअर अँड स्टॉक ब्रोकर्स असोसिएशन' नावाची अधिकृत संस्था स्थापन केली. याच संस्थेला आज आपण बॉम्बे स्टॉक एक्सचेंज (बीएसई) म्हणून ओळखतो. या बाजाराची स्थापना प्रसिद्ध व्यापारी प्रेमचंद रॉयचंद यांनी केली होती. त्यांना 'कॉटन किंग ऑफ बॉम्बे' असेही म्हटले जायचे. वडाच्या झाडाखाली सुरू झालेला हा बाजार आज आशिया खंडातील सर्वात जुना शेअर बाजार आहे. सध्या तो जगातील सर्वात मोठ्या आणि प्रगत शेअर बाजारांपैकी एक आहे.

मुंबई शेअर बाजार हा आशिया खंडातील सर्वात जुना शेअर बाजार आहे. १४२ वर्ष जुन्या असलेल्या मुंबई शेअर बाजाराची स्थापना ९ जुलै १८७५ साली झाली. व्यापारी प्रेमचंद रॉयचंद यांनी मुंबई शेअर बाजाराची स्थापना केली. प्रेमचंद रॉयचंद हे व्यापारी रॉयचंद दीपचंद यांचे पुत्र होते. सफाईदारपणे इंग्लिश बोलणाऱ्या प्रेमचंद यांनी १८४९ मध्ये शेअर ब्रोकर म्हणून कामाला सुरूवात केली. कापूस आणि सोन्याच्या व्यवसायात त्यांनी आपला दबदबा तयार केला. मुंबई शेअर बाजाराचं जन्मस्थान हे १८५० मध्ये एक वडाच्या झाडाखाली आहे. सद्या हे ठिकाण हार्निमन सर्कल नावाने ओळखलं जातं. टाऊन हॉलजवळ वडाच्या झाडाखाली प्रेमचंद रॉयचंद आणि इतर दलाल लोक एकत्र येऊन वेगवेगळ्या धंद्यांची दलाली करायचे. मुख्यतः यावेळी कापसाचे सौदे व्हायचे. सुरूवातीला ४ गुजराती आणि एक पारसी हे दलाल होते. या दलालांना बसण्यास अशी विशिष्ट जागा नव्हती. तसंच वेळेचं बंधन आणि कुठलेही नियमही नव्हते.

टाऊन हॉलसमोरील वडाच्या झाडाखाली हे सर्व दलाल लोक एकत्र येत असत. हळूहळू या ठिकणी दलालांची संख्या वाढली. त्यामुळे येथे जागा अपुरी पडू लागली. १८७४ च्या आसपास वेगवेगळ्या ठिकाणी स्थलांतर होऊन सध्याच्या दलाल स्ट्रीट येथे व्यवहार करायचे ठरवले आणि त्यानंतर 'द नेटीव शेअर ॲन्ड स्टॉक ब्रोकर्सही संस्था १८७५ स्थापन होऊन व्यवहार सुरू झाले.

**काही सेकंदामध्ये व्यवहार**

शेअर बाजार हा एक असा बाजार आहे की ज्या ठिकाणी कंपन्यांच्या शेअर्सची खरेदी - विक्री केली जाते. सुरूवातीला शेअर्सची खरेदी - विक्री तोंडी होत असे. खरेदीदार आणि विक्रेता लिलावामार्फत हे व्यवहार करत होते. मात्र, आता हे सर्व व्यवहार शेअर बाजाराच्या नेटवर्कने जोडलेल्या कॉम्प्युटरमार्फत होतो. इंटरनेटवरही ही सुविधा मिळते. आता अशी परिस्थिती आहे की खरेदीदार आणि विक्रेता एकमेकांना ओळखूही शकत नाहीत. काही वर्षापूर्वी मुंबई शेअर बाजारात थेट खरेदी - विक्री करावी लागत होती. मात्र, मागील काही वर्षांपासून कॉम्प्युटर आणि इंटरनेटच्या माध्यमातून कोणीही घरबसल्या शेअर्स खरेदी करू शकतो आणि विकूही शकतो. अवघ्या काही सेकंदामध्ये हा व्यवहार पूर्ण होतो.

**शेअर बाजाराला तंत्रज्ञानाची जोड**

आता तर मोबाइल ॲप्समार्फतही आपण हे व्यवहार अगदी सहजपणे करू शकतो. माहीत तंत्रज्ञान क्रांतीचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे. जे काम पूर्वी फक्त काही पैसेवालेच करू शकत होते ते आता एक सर्वसामान्य माणूसही करू शकतो. डीमॅट खात्यामार्फत शेअर विकत घेऊ शकतो आणि विकू शकतो.

**नफ्यात भागीदार**

शेअर बाजार हा कोणत्याही विकसीत अर्थव्यवस्थेचा एक महत्वपूर्ण हिस्सा आहे. ज्याप्रमाणे कोणताही देश, गावे किंवा शहरे यांच्या विकासासाठी रस्ता, वीज, पाणी, रेल्वे यांची गरज असते त्याचप्रमाणे देशातील उद्योगांच्या विकासासाठी शेअर बाजार आवश्यक आहे. उद्योग धंदे चालवण्यासाठी भांडवलाची गरज असते. हे भांडवल त्यांना शेअर बाजारातून मिळते. शेअर बाजारामार्फत कोणताही सर्वसामान्य माणूस मोठ्या उद्योगामध्येही आपली भागिदारी करू शकतो. या भागीदारीतून उद्योगांना होणाऱ्या नफ्यामध्ये हिस्सेदार बनू शकतो. जर एखाद्या गुंतवणूकदाराला वाटले की रिलायन्स, टीसीएस, इन्फोसिस या कंपन्या चांगला नफा कमावतील. तर तो या कंपन्यांचे शेअर्स खरेदी करून या नफ्यात भागीदार होऊ शकतो. लाभांशाच्या रुपयाने शेअर्स होल्डरला आपल्या गुंतवणुकीवर परतावा मिळतो. हे सर्व व्यवहार करण्यासाठीची व्यवस्था शेअर बाजार पुरवते. सर्व गुंतवणूकदारांना एक समान संधी मिळेल याची काळजी शेअर बाजार घेते.

# ना तंबाखू ना सिगारेटचं व्यसन तरीही तोंडाचा कॅन्सर



तंबाखू, गुटखा खाणाऱ्यांनाच तोंडाचा कॅन्सर होतो ही चुकीची धारणा, जाणून घ्या लक्षणे

बराच काळ असा समज होता की, तोंडाचा कर्करोग प्रामुख्याने तंबाखू किंवा गुटखा सेवन करणाऱ्यांनाच होतो. मात्र, अलीकडच्या काळात तोंडाचा किंवा ओरोफॅरिन्जियल (घशाच्या वरच्या भागातील) कर्करोग असलेल्या रुग्णांच्या संख्येत वाढ झाली आहे, ज्यांनी कधीही तंबाखूचे सेवन केलेले नव्हते. या बदलत्या प्रवाहामुळे तज्ज्ञांचे लक्ष अशा नवीन जोखीम घटकांकडे वेधले गेले आहे, जे या आजारात भूमिका बजावू शकतात.

**तोंडाच्या कर्करोगाचे मुख्य कारण काय आहे?**

आजकाल तोंडच्या कर्करोगाच्या वाढत्या रुग्णांमागे ह्युमन पॅपिलोमाव्हायरस (एचपीव्ही) – विशेषतः एचपीव्ही-१६ – हा एक महत्त्वपूर्ण घटक म्हणून समोर आला आहे. हा विषाणू तोंड आणि घशातील पेशींवर परिणाम करू शकतो आणि कालांतराने (काही वर्षांनी) कर्करोगास कारणीभूत ठरू शकतो. विशेषतः तरुण आणि धूम्रपान न करणाऱ्या व्यक्तींमध्ये एचपीव्ही-संबंधित कर्करोगाच्या रुग्णांच्या संख्येत मोठी वाढ दिसून येत आहे.

**दुसऱ्यांकडून होणारे धूम्रपान हा एक कारणीभूत घटक :** अनेक तज्ज्ञांचा असाही विश्वास आहे की, दुसऱ्यांकडून होणाऱ्या धूम्रपानामुळे म्हणजेच इतरांच्या तंबाखू किंवा सिगारेटच्या धुराच्या सतत संपर्कात राहिल्याने धोका वाढू शकतो. जरी एखादी व्यक्ती स्वतः धूम्रपान करीत नसली तरीही दीर्घकाळ धुरामध्ये असलेल्या हानिकारक रसायनांच्या संपर्कात राहिल्याने तोंड आणि घशातील पेशींचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे अशा व्यक्तींना तोंडाच्या कर्करोगाचा धोकाही वाढू शकतो.

**आहाराच्या सवयींचाही मुखाच्या कर्करोगाशी संबंध**

आहार आणि जीवनशैलीशी संबंधित घटकांवरही चर्चा केली जात आहे. फळे आणि पालेभाज्यांचा अभाव असलेला आहार, तसेच अति प्रक्रिया केलेले अन्न आणि मोठ्या प्रमाणात साखरयुक्त पेयांचे सेवन यांमुळे शरीरात दाह वाढू शकतो आणि पेशींच्या कार्यावर परिणाम होऊ शकतो. अलीकडील अभ्यासांवरुन असे दिसून येते की, आहाराच्या काही विशिष्ट सवयींमुळे मुखाच्या कर्करोगाचा धोकाही वाढू शकतो. तोंडाच्या कर्करोगाबाबतचे सर्वांत मोठे आव्हान म्हणजे याची सुरुवातीची लक्षणे अनेकदा सामान्य समस्यांसारखीच वाटतात उदा. तोंडात फोड येणे, पांढरे किंवा लाल चट्टे दिसणे, जिभेवर वेदना होणे, आवाजात बदल होणे किंवा अन्न गिळण्यास त्रास होणे. अनेक लोक या लक्षणांकडे गांभीर्याने पाहत नाहीत, ज्यामुळे निदानाला विलंब होतो. म्हणूनच जर तोंडात एखादी जखम, गाठ किंवा कोणताही बदल दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ टिकून राहिला, तर तपासणीसाठी त्वरित तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

**डोके आणि मानेच्या कर्करोगाचे प्रमाण का वाढतेय? :** वायुप्रदूषण हादेखील एक वाढता धोकादायक घटक मानला जातो. हवेतील अतिसूक्ष्म कण शरीरात दीर्घकालीन दाह आणि पेशींचे नुकसान करण्यास कारणीभूत ठरु शकतात. काही अभ्यासकांनी प्रदूषित हवेच्या दीर्घकालीन संपर्कांचा संबंध डोके आणि मानेच्या कर्करोगाच्या वाढत्या धोक्याशी जोडला आहे. जरी या विषयावर अधिक संशोधनाची गरज असली तरी या घटकाकडे दुर्लक्ष न करण्याचा सल्ला दिला जातो. तोंडाची अस्वच्छता आणि दीर्घकालीन दाह यांमुळेही धोका वाढू शकतो.

**संकलन :** यशवंतराव वाघ.

# रुबल नागी यांना ग्लोबल टिचर पुरस्कार



सामाजिक कार्यकर्त्या आणि शिक्षणतज्ज्ञ रुबल नागी यांना २०२६ चा प्रतिष्ठित ग्लोबल टिचर पुरस्कार जाहीर झाला आहे. दुबईमध्ये आयोजित वर्ल्ड गव्हर्नमेंट समीट मध्ये त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या या पुरस्काराअंतर्गत त्यांना १० लाख अमेरिकन डॉलर्स (साधारण ९ कोटी रुपये) एवढी मोठी रक्कम प्रदान करण्यात आली आहे.

रुबल नागी आणि त्यांचे कार्यकला आणि शिक्षण क्षेत्रात आहे. झोपडपट्ट्या आणि दुर्लक्षित भागांमधील रस्त्यांच्या निरुपयोगी भिंतींवर शैक्षणिक भित्तीचित्रे बनवून मुलांना शिकवण्याची त्यांची अभिनव पद्धत आहे. या भित्तीचित्रांच्या माध्यमातून मुले वाचन, लेखन, अंकगणित, स्वच्छता आणि पर्यावरण विषयक जाणीव सहज शिकतात.रुबल नागी आर्ट फाऊंडेशनच्या माध्यमातून संपूर्ण भारतात ८०० हून अधिक शैक्षणिक केंद्रे सुरू केली आहेत. या केंद्रांद्वारे त्यांनी आतापर्यंत १० लाखांहून अधिक मुलांना मुख्य प्रवाहात आणले आहे.

पुरस्काराचे स्वरूप: म्हणजे वर्की फाउंडेशन तर्फे युनेस्कोच्या सहकार्याने हा पुरस्कार दिला जातो. १३९ देशांमधील ५ हजार नामांकनांमधून त्यांची या सर्वोच्च पुरस्कारासाठी निवड झाली. रुबल नागी यांनी कशाप्रकारे दुर्लक्षित भिंतींना शिक्षणाचे केंद्र बनवले.

गाव वस्ती केंद्र बिंदू मानून त्यांनी शैक्षणिक वातावरण निर्माण केले. दुबईमध्ये वर्ल्ड गव्हर्नमेंट्स समिट आयोजित करण्यात आली होती. या समिटमध्ये जागतिक नेते आणि गणमान्य व्यक्तींच्या उपस्थिती मध्ये त्यांनी २०२६ चा जागतिक शिक्षक पुरस्कार जिंकला.

मुंबईतील एका शिक्षिकेचा आंतरराष्ट्रीय पातळीवर सन्मान करण्यात आला आहे. झोपडपट्ट्यांमध्ये जात मुलांना शिकवण्याचा ध्यास घेतलेल्या रूबल नागी यांनी झोपडपट्टीच्या भिंतींवर 'असं' काही केलं. ज्या मुलांना शिक्षणाची सोय नाही त्यांच्या पर्यंत पोहोचण्यासाठी रुबल नागी यांनी पुढाकार घेतला. जागतिक स्तरावर त्यांच्या कार्याची दखल घेतली. भारतासाठी अलौकिक यश त्यांनी प्राप्त केले. त्यामुळे भारतीयांची मान अभिमानाने उंचावली.

# जलसंपदा

जलसंपदा म्हणजे पृथ्वीवर उपलब्ध असलेले सर्व प्रकारचे पाण्याचे स्त्रोत, जे मानवासाठी आणि सजीव सृष्टीसाठी उपयुक्त असतात किंवा ज्यांचा वापर केला जाऊ शकतो. यामध्ये पिण्याचे पाणी, शेतीसाठीचे पाणी आणि औद्योगिक वापरासाठीच्या पाण्याचा समावेश होतो. भारतासारख्या शेतीप्रधान देशात आणि विशेषतः महाराष्ट्रात जलसंपदा व्यवस्थापनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. जलसंपदेचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात:

१. भूपृष्ठावरील जलसंपदा (Surface Water) : नद्या, ओढे, तलाव, मानवनिर्मित धरणे आणि बंधारे यांमध्ये साठलेले पाणी. महाराष्ट्रात गोदावरी, कृष्णा, तापी, भीमा आणि नर्मदा या प्रमुख नद्या भूपृष्ठावरील पाण्याचे मुख्य स्त्रोत आहेत.

२. भूगर्भातील जलसंपदा (Groundwater) : जमिनीखाली मुरलेले पाणी, जे आपण विहिरी, कूपनलिका (बोअरवेल) आणि विंधनविहिरींच्या माध्यमातून उपसतो. भूजल पातळी टिकवून ठेवण्यासाठी पावसाचे पाणी जमिनीत मुरवणे (Water Harvesting) अत्यंत गरजेचे असते.

**महत्त्वाचे आव्हान :** लोकसंख्या वाढ, औद्योगिकीकरण आणि हवामान बदलामुळे (कमी-अधिक पाऊस) जलसंपदेवर प्रचंड ताण येत आहे. त्यामुळे पाण्याचा अपव्यय टाळणे आणि उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करणे ही गरज बनली आहे.

**जलसंपदा विभागाची प्रमुख कामे**


**धरणे आणि कालवे बांधणे:** पावसाचे पाणी साठवून ते टंचाईच्या काळात शेती आणि पिण्यासाठी पुरवणे.

**पूर नियंत्रण:** पावसाळ्यात नद्यांना येणाऱ्या पुराचे व्यवस्थापन करून जीवित व वित्तहानी टाळणे.

**जलसिंचन (Irrigation) :** शेतीला पाण्याचा नियमित पुरवठा करण्यासाठी कालवे आणि उपसा सिंचन योजना राबवणे.

जलसंधारण (Water Conservation): 'पाणी अडवा, पाणी जिरवा' सारख्या योजनांद्वारे भूगर्भातील पाण्याची पातळी वाढवणे.

# एलियास होवे शिलाई मशीनचा शोध लावणारे संशोधक



आज जयंती

एलियास होवे ज्युनियर यांचा जन्म ९ जुलै १८१९ मध्ये स्पेन्सर, मॅसॅच्युसेट्स येथे झाला तर मृत्यू ३ ऑक्टोबर १८६७ रोजी ब्रुकलिन, न्यूयॉर्कमध्ये झाला. लॉकस्टिच लूप पद्धतीत त्यांनी लक्षणीय प्रगती केली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना गोल्ड मेडल, पॅरिस एक्स्पोझिशन ऑफ १८६७ मध्ये मिळाले.

एलियास होवे ज्युनियर यांचा जन्म ९ जुलै १८१९ रोजी मॅसॅच्युसेट्समधील स्पेन्सर येथे डॉ. एलियास होवे सिनियर (१७९२-१८६७) आणि पॉली (बेमिस) होवे (१७९१-१८७१) यांच्या पोटी झाला. होवे यांनी त्यांचे बालपण आणि सुरुवातीची प्रौढ वर्षे मॅसॅच्युसेट्समध्ये घालवली, जिथे त्यांनी १८३५ पासून लोवेलमधील एका कापड कारखान्यात शिकाऊ उमेदवार म्हणून काम करण्यास सुरुवात केली. १८३७ च्या आर्थिक मंदीमुळे गिरण्या बंद पडल्यानंतर, ते केंब्रिज, मॅसॅच्युसेट्स येथे गेले आणि कार्डिंग मशिनरीमध्ये मेकॅनिक म्हणून काम करू लागले, जिथे त्यांनी त्यांचे चुलत भाऊ नॅथॅनियल पी. बँक्स यांच्यासोबत शिकाऊ उमेदवार म्हणून काम केले. १८३८ च्या सुरुवातीला, त्यांनी केंब्रिजमधील अरी डेव्हिस यांच्या दुकानात शिकाऊ उमेदवार म्हणून काम करण्यास सुरुवात केली. डेव्हिस हे क्रोनोमीटर आणि इतर अचूक उपकरणांच्या निर्मिती आणि दुरुस्तीमध्ये विशेषज्ञ असलेले एक कुशल मेकॅनिक होते. डेव्हिस यांच्याकडे काम करत असतानाच होवे यांना शिलाई मशीनची कल्पना सुचली. त्याने ३ मार्च १८४१ रोजी केंब्रिजमध्ये सायमन एम्स आणि जेन बी. एम्स यांची मुलगी एलिझाबेथ जेनिंग्स एम्स हिच्याशी लग्न केले. त्यांना जेन रॉबिन्सन होवे, सायमन एम्स होवे आणि ज्युलिया मारिया होवे ही तीन मुले होती. त्यानंतर त्याने रोझ हॅलाडे हिच्याशी लग्न केले.

शिलाई मशीनची कल्पना मांडणारे हाऊ हे पहिले नव्हते. त्यांच्या आधी इतर अनेक लोकांनी अशा मशीनची कल्पना मांडली होती, त्यापैकी एकाने तर १७९० मध्येच आणि काहींनी तर त्यांच्या डिझाइनचे पेटंट घेतले होते आणि कार्यरत मशीन तयार केली होती, एका प्रकरणात तर किमान ८० मशीन. तथापि, हाऊ यांनी त्यांच्या पूर्वसुरींच्या डिझाइन संकल्पनांमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या आणि १० सप्टेंबर १८४६ रोजी, त्यांना लॉकस्टिच डिझाइन वापरणाऱ्या शिलाई मशीनसाठी पहिले युनायटेड स्टेट्स पेटंट ( यूएस पेटंट ४७५० ) प्रदान करण्यात आले. त्यांच्या मशीनमध्ये बहुतेक आधुनिक मशीनमध्ये आढळणारी तीन आवश्यक वैशिष्ट्ये होती. टोकावर छिद्र असलेली सुई, लॉक स्टिच तयार करण्यासाठी कापडाखाली चालणारे शटल आणि स्वयंचलित फीड. सुईचे छिद्र टोकावर ठेवण्याची कल्पना त्याला कशी सुचली याचे एक संभाव्यतः अप्रमाणित वर्णन त्याच्या आईच्या कुटुंबाच्या कौटुंबिक इतिहासात नोंदवलेले आहे.

शिवणयंत्राच्या सुईचे छिद्र कोठे असावे हे शोधण्यापूर्वी तो जवळजवळ कंगाल झाला होता. हे कसे घडले हे कदाचित फार कमी लोकांना माहीत असेल. त्याची मूळ कल्पना सामान्य सुईच्या रचनेचे अनुकरण करण्याची होती, आणि छिद्र टाचेजवळ असावे. ते टोकाजवळ असावे हे त्याच्या कधीच लक्षात आले नाही, आणि जर त्याने एका अनोळखी देशातील रानटी राजासाठी शिवणयंत्र बनवत असल्याचे स्वप्न पाहिले नसते, तर तो कदाचित पूर्णपणे अयशस्वी झाला असता. त्याच्या प्रत्यक्ष कामाच्या अनुभवाप्रमाणेच, तो सुईच्या छिद्राबद्दल गोंधळलेला होता. त्याला वाटले की राजाने त्याला यंत्र पूर्ण करण्यासाठी आणि ते शिलाईसाठी तयार करण्यासाठी चोवीस तास दिले आहेत. त्या वेळेत काम पूर्ण न झाल्यास मृत्यूची शिक्षा होईल. हाऊ खूप काम करत राहिला, गोंधळात पडला आणि शेवटी त्याने ते सोडून दिले. मग त्याला वाटले की त्याला फाशी देण्यासाठी बाहेर नेले जात आहे. त्याने पाहिले की योद्ध्यांकडे भाले होते, ज्यांना टोकाजवळ छिद्रे पाडलेली होती. त्याच क्षणी त्या अडचणीवर उपाय सापडला, आणि जेव्हा तो संशोधक वेळ मागत होता, तेव्हा तो जागा झाला. सकाळचे चार वाजले होते. तो अंथरुणातून उडी मारून उठला, आपल्या कार्यशाळेकडे धावला आणि नऊ वाजेपर्यंत, टोकाला छिद्र असलेली एक सुई ओबडधोबडपणे तयार झाली होती. त्यानंतर ते सोपे झाले. ही शिलाई मशीनच्या शोधातील एका महत्त्वाच्या घटनेची वास्तव कहाणी आहे. पेटंट मिळवूनही, हाऊला त्याच्या शोधाच्या उत्पादनासाठी अमेरिकेत गुंतवणूकदार शोधण्यात बरीच अडचण येत होती, म्हणून त्याचा मोठा भाऊ अमासा बेमिस हाऊ ऑक्टोबर १८४६ मध्ये निधी मिळवण्यासाठी इंग्लंडला गेला. अमासा त्याचे पहिले मशीन लंडनच्या चीपसाइड येथील विल्यम थॉमस यांना विकू शकला, ज्यांचा कॉर्सेट, छत्र्या आणि व्हॅलिसेस बनवण्याचा कारखाना होता.

# ईश्वरप्राप्तीसाठी साधना प्रथम आणि नंतर तात्त्विकतेचे वाचन

अनेक जण ईश्वरविषयक काही तत्त्वज्ञान सांगणाऱ्या ग्रंथांचे वाचन करत असतात. पैकी बऱ्याच जणांना साधना म्हणजे काय, याची कल्पनासुद्धा नसते. 'साधना म्हणजे ईश्वरप्राप्तीसाठी जाणीवपूर्वक प्रतिदिन काया-वाचा-मन यांच्या माध्यमातून करायच्या कृती.' ईश्वरविषयक तात्त्विक माहिती घेण्याच्या आधी साधना चालू करणे का महत्त्वाचे ? तसेच कुणी आवडते म्हणून ईश्वरविषयक तात्त्विक माहितीचे वाचन करत असतील, तर त्यांनीसुद्धा तत्परतेने साधना का चालू करावी, हे स्पष्ट करण्यासाठी हा लेख !

**शिक्षणशास्त्र काय सांगते ? :** शिक्षणशास्त्रात कृतीयुक्त अध्यापनपद्धत किंवा अनुभवजन्य शिक्षण असावे, असे सांगितले जाते. रसायनशास्त्र शिकायचे झाल्यास काही प्रयोग करावे लागतात किंवा वैद्यकशास्त्र समजायचे झाल्यास रुग्णांना तपासावे लागते. तो तो विषय शिकण्यासाठी त्या त्या विषयानुसार योग्य ते प्रयोग करावे लागतात. अध्यात्म हेही एक स्वतंत्र शास्त्र आहे. अध्यात्माचा प्रायोगिक भाग म्हणजे साधना. आधुनिक विज्ञानात तात्त्विक भाग आणि प्रायोगिक भाग परस्परांना पूरक असतात. त्यातून त्या विज्ञानाचे गम्य समजते, तसेच ईश्वरप्राप्तीचे स्वतंत्र शास्त्र आहे. त्यात तात्त्विक आणि प्रायोगिक भाग परस्परांना पूरकच आहेत. जसा विज्ञानात आहे, तसाच अध्यात्मातही कार्यकारण संबंध, म्हणजे कशामुळे, कशापासून काय झाले इत्यादी सांगितलेले आहे. तो कसा आहे, हे अर्थातच त्या त्या शास्त्राच्याच आधारे समजून घ्यावे लागते.

**ईश्वरप्राप्तीसाठी योग्य स्वपरिवर्तन आवश्यक :** विज्ञानात एकाने शोध लावला, तर बाकीच्यांनी त्याची फळे घेतली असे होऊ शकते. ईश्वरप्राप्तीच्या शास्त्रात 'कुणा एकाने आपण काही करून दुसऱ्याने काहीही साधना केली नाही, तरी त्याला ईश्वरप्राप्ती करून देतो', असे होत नाही. याचे कारण व्यक्तीने स्वत:मध्ये प्रयत्नपूर्वक योग्य ते परिवर्तन घडवून आणत, म्हणजेच साधना करत अंत:करण शुद्धी करून घेतल्यानंतरच ईश्वरप्राप्ती हे ध्येय साध्य होते. असे का हे आपण १. त्रिगुण विचार, २. मल, विक्षेप, आवरण हे जीवाचे गुणधर्म आणि ३. इच्छा, उर्मी, स्फुरण या अंत:करणाच्या क्रिया या ३ अंगांनी समजून घेऊ.

**व्यक्तीची त्रिगुणात्मकता :** पंचमहाभूत, तसेच सत्त्व, रज आणि तम या ३ गुणांनी व्यक्ती बनते. पंचमहाभूतांपासून व्यक्तीचा देह आणि त्रिगुण हे वर्तनाचे निर्देशक आहेत. थोडक्यात सांगायचे झाल्यास सत्त्वगुण म्हणजे ज्ञान, रजगुण म्हणजे क्रियाशीलता, तमगुण म्हणजे आळस. समाजात काही मोजके अपवाद वगळता बहुतांश व्यक्तींमध्ये रज आणि तम या गुणांचेच प्राबल्य असते. ईश्वरप्राप्तीच्या दिशेने पुढे जायचे झाल्यास रज आणि तम या गुणांचे प्राबल्य न्यून होऊन सत्त्व गुणाचे प्राबल्य निर्माण व्हावे लागते.



**व्यवहारज्ञान काय सांगते ?**

व्यवहारात पाककृतींची पुष्कळ पुस्तके वाचली; परंतु चुलीजवळही गेला नाही, अशाला कुणी स्वयंपाकी किंवा आचारी म्हणत नाहीत. येथे प्रत्यक्ष कृती करणे, याला अनन्यसाधारण महत्त्व आहे, हे लक्षात येईल. विचार करून पाहिल्यास अशी व्यावहारिक उदाहरणे पुष्कळ आढळतील.

**ईश्वरप्राप्तीमध्ये सत्त्व गुणाचे महत्त्व :** सत्त्व गुण प्रधानता ही ईश्वरप्राप्तीसाठी उत्तम वाटचाल होण्यासाठी आवश्यक आहे. याचे कारण, म्हणजे सत्त्वगुण हा ज्ञानधारक आहे. सत्त्व गुण प्रधानता असेल, तर विचारांत सुस्पष्टता, विवेक इत्यादी येऊ शकतात. त्यातून जे वाचले ते नेमके समजून जीवनात ते आचरणात आणण्याचा काही प्रयत्न होण्याची शक्यता वाढते. येथे हेही लक्षात घ्यावे की, शब्दांचा, तसेच वाक्यांचा अर्थ समजणे, म्हणजे त्याचा बोध झाला, असे नाही. बोध म्हणजे अंतर्यामी होणारे स्पष्ट आणि दृढ आकलन. स्वतःमध्ये सत्त्व गुणप्रधानता होण्यासाठी रज आणि तम गुण न्यून व्हावे लागतात अन् सत्त्व गुण वाढावा लागतो. हे केवळ तात्त्विक वाचनातून होत नाही. त्यासाठी तम आणि रज गुण न्यून होण्यासाठी स्वभावदोष अन् अहंकार न्यून होऊन आचार-विचार सारेच पालटावे लागते, म्हणजेच साधना करावी लागते. साधनेतील इंद्रियांचा निग्रह आणि मनाचे नियंत्रण इत्यादींमुळे सत्त्वप्रधानता वाढते अन् वाचलेल्या सूत्रातून नेमके काय अपेक्षित आहे, याचे आकलन होऊ लाकते. सत्त्व गुणप्रधानता जितकी अधिक असेल, तर जो बोध होईल, तो तसाच दीर्घकाळ आपोआप टिकून रहाण्याची क्षमता वाढते. याचे कारण सत्त्व गुणाच्या आधारेच ज्ञान, म्हणजे आत्मज्ञान रहात असते.

**मल, विक्षेप आणि आवरण दूर होण्यासाठी साधना अनिवार्य :** अध्यात्मामध्ये जीवामधील अशुद्धतांचे मल, विक्षेप आणि आवरण हे ३ गट सांगितले असून त्यामुळे जीव मायेत अडकलेला आहे, हे सांगितले आहे. त्यामुळे ईश्वरप्राप्तीसाठी त्या अशुद्धता दूर व्हायला हव्यात, हेही सांगितले आहे. मल म्हणजे चुकीचे संस्कार. हे जणू लोखंडाला जसा गंज चढतो, तसे अंत:करणामध्ये असतात. काम, क्रोधादिक षडरिपूंच्या स्वभावदोषात्मक अभिव्यक्तींतून त्याची जाणीव ईश्वरप्राप्तीसाठी व्यक्ती जेवढी सतर्क त्या प्रमाणात होत असते. आता लोखंडावरील गंज केवळ फुंकर मारली, तर जात नाही. त्यासाठी काहीतरी चांगले उपकरण घेऊन लोखंडाला काय वाटेल, याची फिकीर न करता चांगले घासावे लागते, तसेच केवळ तात्त्विक माहिती वाचली आणि जीवातील मल गेला, असे होत नाही. त्यासाठी आचार-विचारांत पालट जाणीवपूर्वक करावे लागतात. सोप्या भाषेत स्वभावदोष-अहंकार आदी प्रयत्नपूर्वक घालवावे लागतात. यासाठी साधना करावी लागते.

**विक्षेप :** माया ब्रह्म आहे, त्या जागी भलतेच काही तरी दाखवून जीवाला अनुभवाला येणाऱ्या जगात गुंतवून टाकते. वास्तव सोडून असे भलतेच काही दाखवणे म्हणजे विक्षेप. त्यामुळे जीव जगाशी बांधला जातो. त्यामुळे त्याला जगात अनंत प्रकारचे भेद वाटत रहातात. यावर उपाय म्हणून उपासनाभक्ती, म्हणजेच साधना आवश्यक आहे. **आवरण :** जीव स्वत:च ब्रह्मस्वरूप असूनही त्याला त्याचा विसर पाडणे, ही मायेची आवरण शक्ती. वरील तिघांमध्ये मल हा सर्वांत स्थूल आहे. तो न्यून झाल्याखेरीज बाकीचे दोन दूर होण्याचा संभवच नाही. त्यामुळे त्या दोघांचा येथे तूर्त फार विचार करण्याची आवश्यकता नाही.

दुर्गेश सामंत
गोवा

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला
गुरुवार, दि. ९ जुलै २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# गटविकास अधिका-याच्या विरोधात महिलांचा ठिय्या

प्रतिनिधी ९ जुलै



**मुर्तीजापुर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महिलांना सन्मान देण्यासाठी विविध योजना काढत आहे तर दुसरीकडे येथील गटविकास अधिकारी मिलिंद मोरे शेतकरी महिलांची समस्या

ऐकत नाहीत. असा आरोप करून जांभा येथील महिलांनी त्यांच्या दालनात ठिय्या आंदोलन केले.

तालुक्यातील जांभा खुर्द गावात सांडपाणी व अपूर्ण नाल्यांच्या समस्येमुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने संतप्त महिलांनी पंचायत समिती कार्यालयात धडक देत गटविकास अधिकारी यांच्या कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले.

गावातील नाल्यांची नियमित साफसफाई होत नसल्याने सांडपाणी रस्त्यावर व घरांसमोर साचत आहे. त्यामुळे दुर्गंधी पसरून डासांची उत्पत्ती वाढली असून मलेरिया, डेंग्यूसारख्या साथीच्या रोगांचा धोका निर्माण झाला आहे. विशेषतः शाळकरी विद्यार्थ्यांना व नागरिकांना साचलेल्या पाण्यातून मार्ग काढत ये-जा करावी लागत असल्याने मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.<आंदोलनादरम्यान महिलांनी प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करत गावातील सांडपाणी व नाल्यांच्या समस्येवर तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली. समस्या त्वरित न सुटल्यास आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला.

यावेळी ग्रामस्थांनी सांगितले की, ग्रामपंचायत, ग्रामसेवक आणि पंचायत समितीकडे अनेकदा लेखी व तोंडी तक्रारी करूनही प्रशासनाने केवळ आश्वासने दिली असून प्रत्यक्षात कोणतीही प्रभावी कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे ग्रामस्थांचा संताप वाढला आहे.

प्रशासनाने या गंभीर समस्येची तात्काळ दखल घेऊन नाल्यांची साफसफाई, सांडपाण्याची योग्य विल्हेवाट आणि आवश्यक विकासकामे त्वरित पूर्ण करावीत, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

आज प्रत्येक ठिकाणी महिलांना सन्मान दिला जातो परंतु मुर्तीजापुरचे गटविकास अधिकारी मिलिंद मोरे यांनी महिलांची समस्या कडे दुर्लक्ष करून नारीशक्तीचा अपमान केलेला आहे शासकीय कामाकडे जायचं असल्याचा सांगून निघून गेले म्हणून मोठ्या प्रमाणात महिलांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

**राजू वानखडे,** शेतकरी

### गटविकास अधिकारी यांनी काढता पाय घेतला

शेतकरी महिलांनी गट विकास अधिकारी यांच्या दालनात आंदोलन केले. गटविकास अधिकारी मिलिंद मोरे यांनी पळ काढला. शेतकरी महिलांचा अपमान केला.

**सुरेश जोगळे,** शेतकरी

# हरीश अलीमचंदानी यांचे चुलत भाऊ हैदराबाद-जयपूर एक्सप्रेसमधून बेपत्ता

## नागरिकांना शोधकार्यात सहकार्य करण्याचे आवाहन

प्रतिनिधी ९ जुलै



**अकोला :** भाजपाचे नगरसेवक हरीश अलीमचंदानी यांचे चुलत भाऊ महेश गोविंदराम अलीमचंदानी हे हैदराबाद-जयपूर एक्सप्रेसने (गाडी क्रमांक १२७२०) प्रवास करत असताना बेपत्ता झाले आहेत. या घटनेमुळे अलीमचंदानी कुटुंबियांमध्ये चिंतेचे वातावरण असून नातेवाईक त्यांचा सातत्याने शोध घेत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, महेश गोविंदराम अलीमचंदानी हे अकोल्याचे रहिवासी आहेत. ते हैदराबादहून परतत असताना हैदराबाद-जयपूर एक्सप्रेसने प्रवास करत होते. २९ जून २०२६ च्या रात्री अंदाजे १० वाजता, कामारेड्डी स्टेशन ओलांडल्यानंतर त्यांचा शेवटचा संपर्क झाला होता. त्यानंतर ते बेपत्ता झाल्याची भीती व्यक्त केली जात असून, अद्याप त्यांचा कोणताही पत्ता लागलेला नाही.

या घटनेनंतर कुटुंबियांनी विविध पातळ्यांवर शोध मोहीम सुरू केली आहे. रेल्वे प्रशासन आणि संबंधित अधिकाऱ्यांशीही संपर्क साधण्यात आला आहे, मात्र अद्याप महेश अलीमचंदानी यांचा कोणताही सुगावा लागलेला नाही.

कुटुंबियांनी सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की, जर कोणालाही महेश अलीमचंदानी यांच्याबद्दल काही माहिती मिळाली किंवा ते कुठे आढळून आल्यास, कृपया तातडीने हरीशभाई अलीमचंदानी 9823180240 किंवा विनोद अलीमचंदानी 9923459521 यांना माहिती द्यावी असे आवाहन केले आहे. महेश आलिमचंदानी तेलंगणा भागातून बेपत्ता झाल्याने कुटुंबीय त्यांचा शोध घेत आहेत. पोलिस यंत्रणा देखील तपास करीत आहे. परंतु अद्याप तरी काही ठावठिकाणा लागला नाही. त्यामुळे कुटुंब चिंता व्यक्त करीत आहे.

# हिवरखेड येथे मुख्यमंत्री जन आरोग्य शिबिराचे आयोजन



**हिवरखेड :** संत तुकाराम महाराज प्रबोधन समिती व प्रयास फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. 12 जुलै रोजी आरोग्य वर्धिनी प्राथमिक आरोग्य केंद्र हिवरखेड येथे सकाळी 9ते दुपारी 2 वाजेपर्यंत भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात अकोला येथील प्रख्यात मेंदूविकार तज्ञ डॉ. नितीन विरवानी,प्रसिद्ध नवजात शिशू व बाल शस्त्रक्रिया विशेषज्ञ डॉ. कृष्णाकुमार केसान,सुप्रसिद्ध प्रसूती, स्त्री रोग तज्ञ व वंध्यत्व निवारण विशेषज्ञ डॉ. शिखा केसान, मुळ हिवरखेड येथील व सद्या अकोला येथे गजानन हॉस्पिटल खडकी अकोलाचे नामांकित ऑर्थोपेडीक डॉ. अंकुश कराळे, त्यांच्या पत्नी सुविख्यात स्त्री रोग व प्रसूती तज्ञ डॉ. प्रिती कराळे,यांच्यासोबत आकोट येथील मातोश्री हॉस्पिटल अँड क्रिटिकल केअरचे सुविख्यात हृदयरोग व मधुमेह तज्ञ डॉ. अभिजित पुंडकर हे रुग्णांची तपासणी करून योग्य उपचार व मार्गदर्शन करणार आहेत. या शिबिरातील शस्त्रक्रियेसाठी निवड झालेल्या रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी मुख्यमंत्री जन आरोग्य सहाय्यता निधी अंतर्गत अर्थ सहाय्य मिळणार आहे.वरील शिबीर निशुल्क असून हिवरखेड व परिसरातील गरजू रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन संत तुकाराम महाराज प्रबोधन समिती व प्रयास फाउंडेशन यांनी केले आहे.

आरोग्य शिबिराचा परिसरातील नागरिकांनी लाभ घेतला. सध्या पावसाळा असल्याने पाण्यापासून होणा-या विकाराची काळजी घ्यावी असे आवाहन डॉक्टरांनी केले.

# अकोटमध्ये काँग्रेसचे बीएलए-2 प्रशिक्षण शिबिर



वि. प्रतिनिधी ९ जुलै

**आकोट :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने आकोट विधानसभा क्षेत्रातील बीएलए-2 मार्गदर्शन व प्रशिक्षण शिबिर उत्साहात पार पडले. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बूथस्तरावरील संघटना बळकट करण्यासाठी आयोजित शिबिरात मतदार यादी अद्ययावत प्रक्रिया, बीएलए-2 यांच्या जबाबदाऱ्या व निवडणूक व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

शिबिराच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष प्रकाश तायडे होते. यावेळी प्रदेश महासचिव ॲड. महेश गणगणे, प्रदेश सचिव प्रशांत पाचडे, संजीवनी बिहाडे, प्रशांत गावंडे, अजय तायडे, डॉ. प्रमोद चोरे, मुकुंद पांडे आदी उपस्थित होते.

ॲड. गणगणे यांनी बीएलए-2 हे बूथस्तरावरील संघटनेचे महत्त्वाचे आधारस्तंभ असून मतदार यादीची अचूकता राखणे व लोकशाही प्रक्रियेचे संरक्षण करणे ही त्यांची महत्त्वाची जबाबदारी असल्याचे सांगितले. शिबिराला काँग्रेसच्या विविध आघाड्यांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# अकोला हिवरखेड बसफेरीत वाढ करा

## प्रवासी व पत्रकारांची मागणी

प्रतिनिधी ९ जुलै



**हिवरखेड :** येथे २९ जून रोजी पत्रकार व नगरपरिषद आरोग्य सभापती यांच्या मागणी वरून तेल्हारा आगाराने हिवरखेड अकोला एस बस सुरू केली. ही बस सुरू झाल्याने अनेक प्रवासी व विद्यार्थी व्यापारी यांना सोयीचे झाले. या फेरीत वाढ करण्याची मागणी आहे.

हिवरखेड अकोट मार्गाचे काम सुरू असल्याने प्रवाशांना या मार्गाने विलंब होतो. बऱ्याच प्रवाशांच्या हाताशी रेल्वे सापडत नाही, त्यामुळेच ही एस टी बस तेल्हारा मार्गे सुरू करण्यात आली, परंतु या मध्ये आणखी प्रवाशांची मागणी वाढली,अकोला ते हिवरखेड या बस फेरीत वाढ करा, संध्याकाळी ६ किंवा दुपारी ५ या नुसार थेट अकोला ते हिवरखेड या एस टी बस फेरीत वाढ करा, तसेच हिवरखेड ते अकोला फलक सुद्धा लावावे, अशी मागणी

पत्रकार गणेश अग्रवाल,संदीप इंगळे, धीरज बजाज, , राजेश पांडव,जितेश कारिया, राहुल गिन्हे, सूरज चौबे, गणेश सुरजोसे, गजानन राठोड, जावेद खान, उमर बेग, शहजाद खान, प्रदीप पाटील, अर्जुन खिरोडकार, यांच्यासह नगरपरिषदच्या आरोग्य सभापती सौ वंदना राजेश वानखडे यांनी मागणी केली आहे.

# आगर पाळोदी रस्त्यामुळे नागरिकांना मनस्ताप

प्रतिनिधी ९ जुलै



**अकोला :** आगर पाळोदी रस्त्यावर चिखल साचल्याने रस्त्यावर चालणे अशक्य झाले आहे. संपूर्ण रस्ता घसरडा झाला आहे. यामुळे वाहने नीट चालवता येत नाही. स्थानिक रहिवाशांची प्रचंड प्रमाणात गैरसोय होते आहे. आवश्यक ठिकाणी ग्राम पंचायत प्रशासनाने मुरूम टाकावा अशी स्थानिक रहिवाशांची मागणी आहे.

गावात एकच मुख्य रस्ता आहे. या रस्त्याचे डांबरीकरण झाले आहे. परंतु पावसाळ्यात रस्ता चिखलमय झाल्यामुळे पायी चालणे देखील कठीण झाले आहे. चिखलामुळे तोल जाऊन पडण्याच्या घटना दररोज घडतात.

# अकोला ते आलेगाव बस फेरी बंद; प्रवाशांमध्ये तीव्र संताप

प्रतिनिधी ९ जुलै



**आलेगाव :** एस टी महामंडळाची अकोला येथून 8.50 ला आलेगाव साठी निघणारी व आलेगाव येथून 10.30 ला अकोला जाणारी बस फेरी अनेक प्रवाशांना फायद्याची ठरणारी बस फेरी अचानक बंद करण्यात आली. त्यामुळे प्रवाशांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून संबंधित अधिकाऱ्यांनी वेळीच दखल घेऊन सदर बस फेरी पूर्ववत सुरू केली नाही तर आलेगावातील नागरिक रस्त्यावर उतरून आंदोलन करणार असल्याचे समोर आले आहे.

पातूर तालुक्यामध्ये सर्वात मोठे गाव म्हणून आलेगाव प्रसिद्ध आहे. तसेच आलेगावला लागून जवळपास २० ते २२ खेडे गावे लागून आहेत. पर्यायाने प्रवाशांची वर्दळ मोठ्या संख्येने असते.तसेच अनेक प्रवाशांना अकोला येथून ८:३० वाजता आलेगाव करीता अकोला ते आलेगाव येणारी बस सेवा अनेक प्रवाशांना वरदान ठरलेली बस सेवा अच्यानक दिनांक ७ रोज पासून बंद करण्यात आली.त्यामुळे अनेक प्रवाशांचे नियोजन कोसळले.

त्यामुळे प्रवाशांनी तीव्र संताप व्यक्त करीत, संबंधितांनी वेळीच बस फेरी पूर्ववत सुरू न केल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन करणार असल्याचे समोर आले आहे.दैनंदिन सकाळी अकोला येथून इतर ऑफिस चे कर्मचारी व शिक्षक ये जा करतात तसेच अंबाशी येथून सकाळी उर्दू शाळेच्या विद्यार्थिनी आलेगाव येथे शाळेत येत असतात.तसेच आलेगाव येथून 10.30 अकोला जाणाऱ्या बस मध्ये पातूर येथे शिकणारे विध्यार्थी आय टी आय देऊळगाव येथे ये जा करणारे विद्यार्थी मोठ्या संख्येने असतात. व आलेगाव येथून विविध कामा करीता अकोला जाणारे भरपूर प्रवाशी असतात आलेगाव वीस हजार लोकसंख्येचे गाव असून आलेगावला लागून जवळपास वीस ते बावीस खेडे गाव लागून आहेत सदर बस अचानक बंद केल्यामुळे शालेय विद्यार्थी व प्रवाशी यांची गैरसोय होत असून प्रवाशाना नाईलाजाने अवैध वाहतुकीच्या वाहनाने प्रवास करावा लागत आहे. तरी संबंधित अधिकाऱ्यांच्या हेकेखोर पणामुळे, एस टी चा खूप मोठा महसूल बुडत असल्याचे प्रवाशांमध्ये बोलले जात आहे.

सदर बस फेरी पूर्ववत सुरू न झाल्यास आलेगातील जनतेकडून आंदोलन केल्या जाईल व परिवहन मंत्री यांना ज्या अधिकाऱ्यांनी सदर बस फेरी बंद केली त्यांच्या विषयी तक्रार दाखल केल्या जाणार असल्याची चर्चा जोमात सुरू आहे. तरी संबंधित अधिकाऱ्यांनी वृत्ताची वेळीच दखल घेऊन प्रवाशांना न्याय द्यावा अशी मागणी होत आहे.

# तेरवीचा कार्यक्रम रद्द करून निधी मातोश्री वृद्धाश्रम व गायत्री बालिकाश्रमाला

प्रतिनिधी ९ जुलै



**अकोला :** गुरुकुल नगरी मलकापुर येथील रहिवासी प्रेमकला रमेश मोरे यांचे 3 जुलै रोजी निधन झाले. त्यांच्या इच्छेनुसार तेरवी न करता तेरवीचा निधी मातोश्री वृद्धाश्रम व गायत्री बालिकाश्रमाला दिला. त्यांचे पुत्र कलाध्यापक विनोद रमेश मोरे यांनी मातोश्री स्व. प्रेमकला रमेश मोरे यांच्या इच्छे प्रमाणे तेरवीचा कार्यकम न करण्याचा निर्णय घेतला. तेरवीचा निधी अनाथ बालके, होतकरु विद्यार्थी, वृद्धाश्रमातील वृद्ध यांना देण्याचे ठरले होते. 7 जुलै रोजी मोरे कुटुंबीयांनी व्यवस्थापकांकडे निधीचा धनादेश सुपुर्द केला. यावेळी प्रशांत मोरे,जयश्री बुरघाटे, दिपाली मोरे, मंदाकिनी वाटाने, अधीरा मोरे आणि आश्रमातील कर्मचारी उपस्थित होते.

# व्यंकटेश बालाजी स्कूलच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

प्रतिनिधी ९ जुलै



**मुर्तीजापुर :** व्यंकटेश बालाजी स्कूल मुर्तीजापुर येथील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे द्वारा आयोजित पूर्व उच्च प्राथमिक वर्ग पाचवी व माध्यमिक वर्ग आठवी शिष्यवृत्ती परीक्षा 2026 मध्ये मेरिट यादीत स्थान मिळवून शाळेच्या यशात मानाचा तुरा खोवला आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात अध्यक्ष अवधूत ढेरे सर, सचिवा राजश्रीताई गोळे मॅडम, मुख्याध्यापिका सारिका कडू मॅडम व पर्यवेक्षिका मीनाक्षी महाजन मॅडम यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. अकोला जिल्ह्यातून वर्ग पाचवीच्या विद्यार्थ्यांपैकी मेरिटमध्ये यशस्वी ठरलेले सर्वज्ञ मंगेश लाखे १०८ वा मेरिट, शिव नंदकिशोर यादव ५ वा मेरिट, वर्ग आठवीतून यशस्वी ठरलेले मंजिरी महेश तिडके २९ वी मेरिट, संकल्प सचिन सरदार ११ वा मेरिट आहे. या यशाबद्दल संस्थाध्यक्ष अवधूत ढेरे सर, सचिवा राजश्रीताई गोळे मॅडम, मुख्याध्यापिका सारिका कडून मॅडम, पर्यवेक्षिका मीनाक्षी महाजन मॅडम यांच्यासह सर्व शिक्षक

# बॉक्सिंग स्पर्धेत त्रिशा पटकेला रौप्य पदक

प्रतिनिधी ९ जुलै

**अकोला :** पाळधी येथे झालेल्या पहिल्या राज्य अजिंक्यपद कब क्लास, कॅडेट व सब-ज्युनिअर अंडर-१५ बॉक्सिंग स्पर्धेत अकोल्याच्या एचआरआय महान्सा नारायणी पब्लिक स्कूलची विद्यार्थिनी त्रिशा दिगंबर पटके हिने उत्कृष्ट कामगिरी करत ४६ ते ४९ किलो वजन गटात रौप्यपदक पटकावले. त्रिशाचे वडील भारतीय लष्करात असून, त्यांच्या प्रेरणेतून तिने राज्यस्तरीय स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करत अकोल्याच्या क्रीडा क्षेत्राचा गौरव वाढविला आहे. त्रिशाच्या या यशामागे आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग प्रशिक्षक डॉ. सतीशचंद्र भट यांच्यासह गजानन कबीर, आदित्य माने आणि योगेश निषाद यांच्या शिस्तबद्ध प्रशिक्षणाचे फळ तिला मिळाले..त्रिशाच्या या कामगिरीमुळे अकोला जिल्ह्यातील बॉक्सिंग खेळाला नवी उभारी मिळाली असून, तिचे प्रशिक्षक, आई-वडील आणि शाळेचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

## जाहीर नोटीस

**विद्यमान २रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात**

प्रोसेस क. २१२७/२०२६ दिनांका: ०१/०७/२०२६
एम.जे.सी. क. १४५/२०२६ चौकशी तारीख २३/०७/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती पुष्पा अरूण सयाम, वय ५०, धंदा घरकाम २. शुभम अरूण सयाम वय २७. धंदा - शेती ३. अतुल अरूण सयाम, वय १९, धंदा -शिक्षण सर्व रा.मु. गाजीपुर, पो. पोपटखेड, ता. अकोट जि अकोला

विरुध्द

**गैरअर्जदार -** कोणीही नाही.

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन VIII १८२७ ये कलम २ अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे.

अर्जदार हे वरील ठिकाणचे रहिवासी असून अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क २ व ३ ये वडील नामे अरूण महादेव सयाम हे आपले संपुर्ण जिवनकाळात मौजे. गाजीपुर, पो. पोपटखेड, ता. अकोट जि. अकोला येथेच राहले व तेथेच दि. १९/०४/२०१६ रोजी मयत झाले आहेत तसेच मयत अरूण महादेव सयाम यांचा अन्य एक मुलगा नामे सचिन अरूण सयाम हा दि. १४/०४/२०१३ रोजी मौजे. गाजीपुर, पो. पोपटखेड, ता. अकोट जि. अकोला येथे अविवाहीत मयत झाला आहे. तसेच अरूण महादेव सयाम यांची आई नामे सरस्वताबाई महादेव सयाम हया बरेय वर्षापुर्वी मयत झाल्या आहेत. मयत अरूण महादेव सयाम यांना अर्जदार क. १ ते ३ यांचे व्यतीरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वतः वारस असल्यास, सदरची नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाचे आंत, त्यांनी उपरोक्त न्यायायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानुसार निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक ०१/०७/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधिक्षक (न्यायीक)**
दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोट, जि. अकोला.

# माना आरोग्य उपकेंद्राची सीईओ अनय नावंदर यांच्या कडून पाहणी

प्रतिनिधी ९ जुलै




**अकोला :** प्राथमिक आरोग्य केंद्र कुरूम अंतर्गत येणाऱ्या आरोग्य उपकेंद्र माना, व आयुर्वेदिक दवाखाना ता. मूर्तिजापूर येथे जिल्हा परिषद अकोलाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनय नावंदर यांनी आज भेट देऊन आरोग्य सेवांचा सविस्तर आढावा घेतला. या भेटीदरम्यान उपकेंद्रामध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची अंमलबजावणी, नोंदी, औषधसाठा तसेच नागरिकांना दिल्या जाणाऱ्या आरोग्य सुविधांची तपासणी करण्यात आली.

यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे,तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुधीर कराळे, वैद्यकीय अधिकारी तसेच आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जलजन्य व कीटकजन्य आजारांच्या प्रतिबंधासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना, असंसर्गजन्य आजारांच्या तपासण्या व उपचार, विविध आरोग्य पोर्टलवरील नोंदी, 'माझं गाव – आरोग्य संपन्न गाव' अभियानाची अंमलबजावणी, स्वच्छता अभियान, पिण्याच्या पाण्याच्या शुद्धीकरणाची व्यवस्था, औषध व आवश्यक साहित्याचा साठा, आरोग्य शिक्षण विषयक साहित्य तसेच आरोग्य शिक्षण पद्धती आरोग्य शिक्षणाबाबत सोशल मीडियाचा वापर .कुटुंब नियोजन कार्यक्रम तसेच शस्त्रक्रियांच्या प्रगतीचा आढावा घेतला.

याशिवाय उपकेंद्र परिसरातील हर्बल गार्डनची पाहणी करून त्याची देखभाल,आणि परिसराची स्वच्छता याबाबतही त्यांनी समाधान व्यक्त केले. रुग्णांना दर्जेदार व वेळेवर आरोग्य सेवा मिळाव्यात, यासाठी आवश्यक सुविधा व नोंदी अद्ययावत ठेवण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. भेटीदरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी अनय नावंदर यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या कामकाजाची माहिती घेतली. आरोग्य सेवा अधिक प्रभावी करण्यासाठी येणाऱ्या अडचणी जाणून घेत त्यावर आवश्यक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले. स्वच्छता, नोंदींची शिस्त, राष्ट्रीय कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी आणि कर्मचारी वर्गाची कार्यपद्धती याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

## CORRIGENDUM

**Tender No.:- CE/AKLZ/AKL/T-01/2026-27**

**Name of Work:**-Supply of various Testing Equipment for Testing Division Akola, under Akola Zone, for amount **Rs. 50.00 Lakhs.**

It is hereby informed that, the specified make and model of all Testing Equipment's mentioned in the said tender are withdrawn. Bidders may quote equipment conforming to the prescribed technical specifications, subject to compliance with all tender conditions.

All other terms and conditions of the tender shall remain unchanged.

The Tender details/documents with Amendments is available on web site **https://etender.mahadiscom.in/eatApp/** and last date of submission is extended upto 22.07.2026 upto 15.00 hrs. Changes in Tender Schedule, Corrigendum etc., if any, will be available on M.S.E.D.C.L.'s web site only.

**(P.R.O No. 76/2026)** **The Executive Engineer (Adm.)**

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. ९ जुलै २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# चिलगव्हाण येथील इसमावर प्राणघातक हल्ला

## ४ आरोपींविरुद्ध गुन्हा, १२ तासांत ३ जण जेरबंद

प्रतिनिधी ९ जुलै

**महागाव** : महागाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चिलगव्हाण येथे एका इसमावर जीवघेणा हल्ला केल्याप्रकरणी चार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, गुन्हा नोंद झाल्यानंतर अवघ्या १२ तासांत तीन आरोपींना अटक करण्यात महागाव पोलिसांना यश आले आहे.

याप्रकरणी शीतल राहुल खंदारे (वय २२, रा. चिलगव्हाण, ता. महागाव) यांनी महागाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादीनुसार, दोन वर्षांपूर्वी गणपती विसर्जनाच्या वेळी झालेल्या वादातून आरोपी अजय बाबाराव सुपळे, अक्षय आत्माराम राऊळ, वैभव पंडित रावते व श्रीधर पंडित रावते हे फिर्यादीच्या कुटुंबाविषयी मनात राग धरून होते.

दि. ६ जुलै रोजी रात्री साडेआठच्या सुमारास फिर्यादी व तिचे पती राहुल खंदारे हे घरी जेवत असताना आरोपी वैभव रावते याने राहुल यांना बाहेर बोलावून नेले. काही वेळातच गावात आरडाओरड ऐकू आल्यानंतर फिर्यादी व नातेवाईक घटनास्थळी पोहोचले असता राहुल खंदारे यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला झाल्याचे दिसून आले. या हल्ल्यात त्यांच्या डोक्यावर, पाठीवर, खांद्यावर व कानावर गंभीर जखमा झाल्या असून त्यांच्यावर पुसद येथे उपचार सुरू आहेत.फिर्यादीच्या तक्रारीवरून महागाव पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३



मधील संबंधित कलमे तसेच अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियमांतर्गत चार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक सेवानंद वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली चार स्वतंत्र पथके तयार करण्यात आली. या पथकांनी तातडीने शोधमोहीम राबवून अवघ्या १२ तासांत तीन आरोपींना अटक केली. उर्वरित आरोपीचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली महागाव पोलीस ठाण्याच्या पथकाने केली.

# अयोध्येतील राममंदिर लुटीच्या विरोधात शिवसेना (उबाठा) पक्षाचे 'रामरक्षा महाआरती आंदोलन'

प्रतिनिधी ९ जुलै

**य वतमाळ** : अयोध्या येथील प्रभू श्रीराम मंदिरात गोळा झालेल्या देणगीच्या पैशांमध्ये प्रचंड आर्थिक गैरव्यवहार आणि लूट होत असल्याचा आरोप करत, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने बुधवारी (दि. ८) स्थानिक दत्त चौकात तीव्र निदर्शने करण्यात आली. पक्षाच्या वतीने या ठिकाणी 'रामरक्षा महाआरती आंदोलन' छेडण्यात आले होते. या आंदोलनादरम्यान महाआरतीसह सामूहिक रामरक्षा स्तोत्र आणि हनुमान चालीसाचे पठण करून केंद्र व राज्य सरकारचा तीव्र निषेध नोंदवण्यात आला.

अयोध्येतील राम मंदिरात सामान्य जनतेने अर्पण केलेल्या पैशांची चोरी झाल्याचा आरोप करत शिवसैनिक मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले होते. आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी दिलेल्या 'चौकीदार ही चोर है' अशा घोषणांनी संपूर्ण दत्त चौक परिसर दणाणून सोडला होता.




### दत्त चौकात हनुमान चालीसा पठण

**भाजप म्हणजे चोर आणि दरोडेखोरांची पार्टी: राजेंद्र गायकवाड**

आंदोलकांना संबोधित करताना शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख राजेंद्र गायकवाड यांनी भाजपवर अत्यंत घणाघाती टीका केली. ते म्हणाले, "भाजप म्हणजे आता चोर आणि दरोडेखोरांची पार्टी झाली आहे. आमचा पक्ष चोरला, आमचे चिन्ह चोरले, आमचे खासदारही चोरले आणि आता तर यांनी हद्द पार केली असून, थेट प्रभू श्रीरामाच्या मंदिरातील पैशांवर डल्ला मारला आहे."

मंदिराच्या उद्घाटनापासून सर्व पूजाविधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आणि त्यांनीच नेमलेले विश्वस्त आज चोरी करत आहेत, अशी संतप्त भावना गायकवाड यांनी व्यक्त केली.

**देशापाठोपाठ आता राम मंदिर लुटायला सुरुवातः किशोर इंगळे**

शिवसेना जिल्हाप्रमुख किशोर इंगळे यांनीही केंद्र सरकारवर निशाणा साधला. "भाजपने आधी पूर्ण देश लुटला आणि आता राम मंदिर लुटायला सुरुवात केली आहे," असे प्रतिपादन त्यांनी केले.

तर महिला आघाडीच्या नेत्या सागरताई पुरी यांनी भाजपच्या भूमिकेवर सवाल उपस्थित केले. "अयोध्येतील राम मंदिरात सामान्य जनतेच्या श्रद्धेचा आणि भावनांचा खेळ मांडला जात आहे. रामाच्या नावावर मते मागणाऱ्या भाजपला आता थोडी तरी लाज वाटली पाहिजे," अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला.

**जोपर्यंत हिशोब मिळत नाही, तोपर्यंत शांत बसणार नाही!**

देशातील आणि राम मंदिरातील भ्रष्टाचाराचा हिशोब जनतेला मिळालाच पाहिजे, आणि जोपर्यंत लुटीतील पैसे मंदिरात परत येत नाहीत, तोपर्यंत शिवसैनिक शांत बसणार नाही, असा निर्धार या आंदोलनाच्या माध्यमातून शिवसेनेच्या वतीने करण्यात आला.

या आंदोलनात शहर प्रमुख चेतन शिरसाट, शिवसेना सचिव तुषार देशमुख, युवा सेना लोकसभा संघटक विकास पवार, युवासेना उपजिल्हाप्रमुख गिर्जानंद कळंबे, राजेंद्र कोहरे, चंद्रकांत उडाके, संजय राठोड, दिनकर भवरे, संतोष चव्हाण, सचिन बारस्कर, जयराज बहादुरे, अशोक पुरी, अमन मते, राजू राऊत, राजू शेख, अभिजीत पवार, बाळू बळवंते, उमेश पवार, हेमंत उगले, अनिकेत आडे, दिनेश चव्हाण, अतुल जोमदे, गोपाल मांढरे, गुणवंत मेश्राम, जुनेद शेख, रामकृष्ण घरडे, सचिन चोरडिया, गजानन अवधूत कार, अमोल तुळसकर यांच्यासह शेकडो शिवसैनिक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांचा गौरव

प्रतिनिधी ९ जुलै

**यवतमाळ** : क्रांतिदूत सेवानिवृत्त पोलिस कल्याणकारी सेवाभावी न्यास यवतमाळच्या वतीने जिल्हा पोलिस विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी - कर्मचाऱ्यांचा सत्कार शुक्रवारी केला जाणार आहे. येथील दारव्हा रोडवरील कोल्हे सभागृहात सकाळी ११ वाजता या कार्यक्रमाला सुरुवात होईल. विभागातून ३० जून रोजी सेवानिवृत्त झालेल्यांचा सत्कार केशव शर्मा यांच्या हस्ते केला जाणार आहे. यावेळी उपस्थित राहावे, अशी विनंती आयोजकांच्या वतीने करण्यात आली. महिन्याच्या शेवटच्या तारखेला सेवानिवृत्त होत असलेल्या सेवानिवृत्त पोलिस अधिकारी, कर्मचारी यांचा या संघटनेच्या वतीने सत्कार केला जातो.

# पुसद अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाला उमरखेड उपविभाग जोडण्यास विरोध

## स्वतंत्र कार्यालयाची मागणी

प्रतिनिधी ९ जुलै

**उमरखेड** : प्रस्तावित पुसद अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयात उमरखेड उपविभागाचा समावेश करू नये, तसेच उमरखेड येथे स्वतंत्र अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करावे, अशी मागणी उमरखेड जिल्हा निर्मिती संघर्ष समितीने केली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी यांच्या २३ जूनच्या जाहीर सूचनेवर समितीने आक्षेप नोंदविला आहे.

समितीचे अध्यक्ष नंदकिशोर अग्रवाल आणि सचिव डॉ. गणेश घोडेकर यांनी दाखल केलेल्या आक्षेपात, पुसद हे उमरखेड व महागाव तालुक्यांसाठी भौगोलिकदृष्ट्या दूर असून नागरिकांच्या प्रशासकीय कामकाजासाठी गैरसोयीचे ठरेल, असे नमूद केले आहे. त्याऐवजी उमरखेड येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करणे अधिक व्यवहार्य ठरेल, असा दावा करण्यात आला आहे.

उमरखेड हे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७ तसेच वाशीम, अकोला, अमरावती, यवतमाळ, किनवट आणि आदिलाबादला जोडणाऱ्या प्रमुख मार्गांच्या केंद्रस्थानी असल्याने प्रशासकीयदृष्ट्या सोयीचे ठिकाण असल्याचे समितीने म्हटले आहे. नांदेड आयुक्तालयापासूनचे कमी अंतर, प्रस्तावित नांदेड-वर्धा रेल्वेमार्ग, मोठे क्षेत्रफळ, लक्षणीय लोकसंख्या, उपलब्ध शासकीय जमीन आणि आदिवासीबहुल लोकसंख्या हीही उमरखेडच्या बाजूने असल्याचा दावा करण्यात आला आहे. याशिवाय मोठी बाजारपेठ, प्रस्तावित सहस्रकुंड जलविद्युत प्रकल्प, अभयारण्य, चार पोलीस ठाण्यांचे कार्यक्षेत्र तसेच ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा यामुळे उमरखेड हे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयासाठी अधिक योग्य ठिकाण असल्याचे समितीने आक्षेपात नमूद केले आहे.

उमरखेड उपविभागाचा प्रस्तावित पुसद अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयात समावेश न करता उमरखेड येथे स्वतंत्र अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घ्यावा, अशी मागणी संघर्ष समितीने केली आहे.

# राम मंदिर प्रकरण : आर्णीत उबाठाची 'रामरक्षा महाआरती'

प्रतिनिधी ९ जुलै

**आर्णी** : राम मंदिरातील क थित गैरव्यवहार व चोरीच्या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने मंगळवारी आर्णीत 'रामरक्षा महाआरती आंदोलन' करण्यात आले. शिवनेरी चौक, निलावार मार्केट आणि हनुमान मंदिर रोड परिसरात झालेल्या आंदोलनात शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या निर्देशानुसार राज्यभर सुरू असलेल्या आंदोलनाचा भाग म्हणून श्रीरामांच्या प्रतिमेसमोर रामरक्षा पठण व महाआरती करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी श्रीरामाच्या जयघोषात आंदोलनाला प्रतिसाद दिला.



जिल्हाप्रमुख प्रवीण (पिंटू) शिंदे यांनी राम मंदिरातील कथित चोरीच्या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. या प्रकरणात कोणालाही पाठीशी घालू नये, अशी भूमिका त्यांनी मांडली. माजी आमदार बाळासाहेब मुंगीनवार यांनी राम मंदिर ट्रस्ट बरखास्त करून संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली.

या आंदोलनात तालुकाप्रमुख उज्वल मोरे, शहरप्रमुख पंकज शिवरामवर, रमेश ठाकरे, सदाशिव धाये, गणेश राठोड, पवन वाघमारे, मोहन ठाकरे, आशिष निरपसे, सचिन चौधरी, आनंद शिंदे, गोकुळ शेगर, विजय इंगोले, प्रमोद शिंदे, साहेबराव राठोड, विकास मुंडे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते. महाआरती आणि रामरक्षा पठणानंतर आंदोलनाची सांगता करण्यात आली.

# रिपब्लिकन सेनेच्या यवतमाळ-वाशीम लोकसभा अध्यक्षपदी सुनील चिंचोलकर



प्रतिनिधी ९ जुलै

**उमरखेड** : आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन सेनेने विदर्भातील संघटनात्मक फेरबदलाला सुरुवात केली असून, सुनील पाटील चिंचोलकर यांची यवतमाळ-वाशीम लोकसभा अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

रिपब्लिकन युवा सेनेचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष म्हणून केलेल्या कार्याची दखल घेत ही नियुक्ती करण्यात आल्याचे पक्षाकडून सांगण्यात आले. राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांच्या आदेशानुसार, प्रदेशाध्यक्ष डॉ. सुशील सूर्यवंशी यांच्या सूचनेवरून आणि युवा प्रदेशाध्यक्ष किरण घोंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली विदर्भ अध्यक्ष प्रफुल शेंडे यांनी चिंचोलकर यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. यावेळी प्रभारी विदर्भाध्यक्ष योगेंद्र चवरे, विदर्भ सचिव अमोल कुमार, राजेश मेश्राम यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. नियुक्तीनंतर चिंचोलकर यांनी वरिष्ठ नेतृत्वाचे आभार मानत यवतमाळ व वाशीम जिल्ह्यात संघटन विस्तारासाठी 'रिपब्लिकन सेना संवाद दौरा' आणि सदस्य नोंदणी मोहीम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. आगामी निवडणुकांच्या दृष्टीने पक्षबांधणी मजबूत करण्यासोबतच शेतकरी, कामगार, विद्यार्थी आणि स्थानिक नागरी प्रश्नांवर प्राधान्याने काम केले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या नियुक्तीचे यवतमाळ आणि वाशीम जिल्ह्यातील पक्ष कार्यकर्त्यांनी स्वागत केले असून, यावेळी गौतम नवसागरे, शुद्धोधन दिवेकर, सतीश खिल्लारे, संदीप राऊत आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# सोयाबीन उगवलेच नाही

## निकृष्ट बियाण्यांप्रकरणी चौकशीची मागणी

प्रतिनिधी ९ जुलै

**आर्णी** : तालुक्यात निकृष्ट दर्जाच्या सोयाबीन बियाण्यांमुळे अनेक शेतांमध्ये उगवण न झाल्याने शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. त्यामुळे झालेल्या आर्थिक नुकसानीची भरपाई देण्यासह दोषींवर कारवाई करावी, या मागणीसाठी बहुजन मुक्ती पार्टीने तालुका कृषी अधिकारी यांना निवेदन दिले.

निवेदनानुसार, शेतकऱ्यांनी मोठा खर्च करून बियाण्यांची खरेदी व पेरणी केली. मात्र अनेक ठिकाणी उगवण अत्यल्प झाली किंवा झालीच नाही. परिणामी बियाणे, मशागत, मजुरी, खत आणि इतर शेतीवरील खर्च वाया गेला असून दुबार पेरणीसाठी अतिरिक्त खर्चाचा बोजा शेतकऱ्यांवर पडला आहे.



या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित बियाण्यांचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावेत, दोषी बियाणे उत्पादक कंपन्या, वितरक व विक्रेत्यांविरुद्ध कठोर कारवाई करावी, तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक भरपाई, मोफत बियाणे आणि दुबार पेरणीसाठी विशेष अनुदान द्यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

भविष्यात निकृष्ट दर्जाच्या बियाण्यांची विक्री रोखण्यासाठी कृषी विभागाने विशेष तपासणी मोहीम हाती घ्यावी, अशीही मागणी करण्यात आली.

प्रशासनाने तातडीने कार्यवाही न केल्यास शेतकऱ्यांसमवेत लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा बहुजन मुक्ती पार्टीचे आर्णी-केळापूर विधानसभा प्रभारी भुवन मुनेश्वर यांनी दिला.

# शेंबाळपिंपरीतील मंजूर अप्पर तहसील कार्यालय हलवू नका

## जैनुल सिद्दीकी यांचा आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी ९ जुलै

**पुसद** : शेंबाळपिंपरी येथे शासनाने मंजूर केलेले अप्पर तहसील कार्यालय कोणत्याही परिस्थितीत अन्यत्र हलवू नये, अशी ठाम भूमिका शेंबाळपिंपरी तालुका निर्मिती संघर्ष समितीचे मार्गदर्शक जैनुल सिद्दीकी यांनी व्यक्त केली आहे. कार्यालयाच्या मंजुरीनंतर शासनाने नियमानुसार आक्षेप मागविले असून ती नियमित प्रशासकीय प्रक्रिया असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

- अप्पर तहसील कार्यालय हा परिसरातील नागरिकांचा हक्क असून ते शेंबाळपिंपरीतच कायम ठेवावे, अशी सर्वस्तरातून मागणी होत आहे. शासनाने हा निर्णय बदलण्याचा प्रयत्न केल्यास शेंबाळपिंपरी व परिसरातील सर्वपक्षीय नागरिक, शेतकरी, व्यापारी आणि विद्यार्थी एकत्रितपणे तीव्र आंदोलन उभारतील, असा इशाराही जैनुल सिद्दीकी यांनी दिला.

अप्पर तहसील कार्यालय सुरू झाल्यास शेंबाळपिंपरीसह परिसरातील शेतकरी, महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्यांना महसूलविषयक कामांसाठी मोठा दिलासा मिळेल. कार्यालय अन्यत्र हलविल्यास नागरिकांना पुन्हा पुसदला जावे लागेल. त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांचा अतिरिक्त खर्च सहन करावा लागेल, असे त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांना जात, उत्पन्न, रहिवासी व इतर शैक्षणिक प्रमाणपत्रांसाठी दूर जावे लागल्यास त्याचा अभ्यासावर परिणाम होईल. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांवर अतिरिक्त भार पडेल, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली.

# उमरखेड-पोफाळी-कुपटी मार्गाची दुरवस्था

## वाहनचालकांचा जीव धोक्यात

प्रतिनिधी ९ जुलै

**उमरखेड** : उमरखेड-पोफाळी-कुपटी राज्य मार्गाची गेल्या पाच-सहा वर्षांपासून दुरवस्था कायम आहे. पावसाळ्यात या मार्गावर प्रवास करणे वाहनचालकांसाठी धोकादायक बनले आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असल्याची तक्रार वाहनधारकांनी केली आहे.

पावसामुळे रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य पसरले असून, दुचाकी व चारचाकी वाहनांची घसरण होऊन अपघाताचा धोका वाढला आहे.

**रस्ता की पाऊलवाट?**

- उमरखेड-पोफाळी-कुपटी मार्गावरील खड्ड्यांमुळे हा रस्ता आहे की पाऊलवाट, असा प्रश्न वाहनचालक उपस्थित करीत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने दुरुस्तीची कामे हाती घेऊन नागरिकांना सुरक्षित प्रवासाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी होत आहे.



या मार्गावरून विविध विभागांचे अधिकारी व लोकप्रतिनिधींची ये-जा होत असतानाही रस्त्याच्या दुरुस्तीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून खड्डे बुजविण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे. सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात या प्रश्नाकडे लोकप्रतिनिधींनी लक्ष देऊन निधी उपलब्ध करून द्यावा, अशी अपेक्षाही व्यक्त होत आहे.

# प्री-मॅट्रिक शिष्यवृत्तीत फुलसावंगीच्या उर्दू शाळेची भरारी; सहा विद्यार्थिनींचे यश

प्रतिनिधी ९ जुलै

**फुलसावंगी** : जे. एस. पी. एम. उर्दू हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेज ऑफ आर्ट्स, फुलसावंगी येथील विद्यार्थिनींनी प्री-मॅट्रिक शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवत शाळेच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक परंपरेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब केले आहे. शाळेतील सहा विद्यार्थिनींनी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्रता मिळवून संस्थेचा नावलौकिक उंचावला.

यशस्वी विद्यार्थिनींमध्ये सनोबर सहेर समीर अहमद (६८.६६ टक्के), शहेजीन फातेमा अ. कलीम (६२ टक्के), अदीबा फातेमा अ. अलीम (६०.६६ टक्के), अरफात खान रियाज खान (६०.६६ टक्के), अलिना सहेर बाबा खान (५९.३३ टक्के) आणि आरजू परवीन शेख युनुस (५८ टक्के) यांचा समावेश आहे.



या यशामागे विद्यार्थिनींची मेहनत, पालकांचे प्रोत्साहन आणि शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन असल्याचे मुख्याध्यापक मोहम्मद मुसद्दीक यांनी सांगितले. त्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन करत भविष्यातही स्पर्धा परीक्षांमध्ये अशीच कामगिरी करण्याचा विश्वास व्यक्त केला. विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांनी त्यांचे अभिनंदन केले असून परिसरातूनही त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# अमरावतीत बोगस बियाण्यांमुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट; खासदार डॉ. अनिल बोंडे आक्रमक

## दोषी कंपन्या, दुकानदारांवर कार्यवाही करा करा, शेतकऱ्यांना मोबदला द्या

प्रतिनिधी ९ जुलै



**अमरावती** : जिल्ह्यात अनेक ठिकाणी पेरणी करूनही सोयाबीनचे बियाणे न उगवल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या गंभीर परिस्थितीवर राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी चिंता व्यक्त करत प्रतिक्रिया दिली आहे. "बियाणे न उगवल्यामुळे बळीराजावर दुबार पेरणीची वेळ आली असून त्याला मोठा आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे," असे डॉ. बोंडे म्हणाले.

या फसवणुकीची कृषी विभागाने तातडीने दखल घेऊन सविस्तर अहवाल थेट कृषिमंत्र्यांना सादर करावा, असे निर्देश त्यांनी दिले आहेत. तसेच, बोगस सोयाबीन विकणाऱ्या कंपन्या आणि संबंधित दुकानदारांवर कडक कायदेशीर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

"फसवणूक झालेल्या प्रत्येक शेतकऱ्याला योग्य मोबदला मिळालाच पाहिजे," या भूमिकेचा पुनरुच्चार करत, तक्रारदार शेतकऱ्यांनी न घाबरता पुढे येऊन याबाबतची माहिती प्रशासनाला द्यावी, असे आवाहनही खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी केले आहे.

# राजापेठ पोलीसांनी प्राणघातक शस्त्र बाळगुण इन्स्टाग्रामवर फोटो व्हायरल करणाऱ्या आरोपीला ताब्यात

प्रतिनिधी ९ जुलै



**अमरावती** : राजापेठ पोलीसांनी प्राणघातक शस्त्र जवळ बाळगुण इन्स्टाग्रामवर फोटा व्हायरल करणा-या आरोपीला ताब्यात घेतले आहे.

पोलीस स्टेशन राजापेठचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांना इन्स्टाग्रामवर एक इसम हातात चाकु सारखे प्राणघातक शस्त्र बाळगुन फोटो इन्स्टाग्राम, सोशल मिडीयावर व्हायरल होत असल्याची माहीती मिळताच त्यांनी राजापेठ डि.बी ला आदेश देवुन ताबडतोब व्हायरल फोटोमधील इसमाला पकडुन कार्यवाही बाबत आदेश दिल्याने राजापेठ डि. बी. चे प्रमुख सपोनी नितीन शिंदे व सोबत पो स्टॉफ हे दि. 8 जुले चे 9. वा. पासुन पेटोलींग व इन्स्टाग्रामवर प्राणघातक शस्त्र हातामध्ये घेवुन तो फोटा व्हायरल करणा-या इसमावर कार्यवाही करीत असतांना एक इसम प्राणघातक शस्त्र घेवुन मांडवा झोपडपटी, दसरा मैदान, अमरावती येथुन जात आहे.

अशा मिळालेल्या बातमीच्या आधारे मांडवा झोपडपटटी, दसरा मैदान, अमरावती येथे पो. स्टॉफ व पंचां समक्ष आरोपी नामे संकेत उमेश वानखडे, वय 21 वर्षे, रा. दसरा मैदान, अमरावती याला ताब्यात घेण्यात आले.

नमुद आरोपी कडुन एक स्टिल पात्याचा चाकु जप्त करण्यात आला.मनमुद आरोपी हयांचे हातामध्ये प्राणघातक शस्त्र जवळ बाळगुन इन्स्टाग्रामवर फोटो व्हायरल करून सर्वसामान्य लोकांच्या मनामध्ये दहशत पसरवीत होता. वरून त्यांचे विरूध्द पो. स्ट. ला अपराध कमांक 562/2026 कलम 4/25 आर्म अॅक्ट सहकलम 135 मपोका अन्वये दाखल करण्यात आला.

सदरची कारवाई राकेश ओला, पोलीस आयुक्त, श्याम घुगे, पोलीस उपायुक्त परि 2 अमरावती, संजय खटाळे, सहायक पोलीस आयुक्त, अमरावती, यांचे मार्गदर्शना खाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक, संदीप चव्हाण, सपोनी नितीन शिंदे, पोहेकॉ मनीश करपे, पोहेकॉ पवन तिवारी, पोहेकॉ पंकज खटे, पोहेका रवी लीखीतकर, पोहेकॉ शशी शेळके, पोकॉ अंकुश काळे, पोकॉ नरेश बावने, पोकॉ प्रशांत बेलोरकर, पोका अर्जुन कदम, पोकॉ अमोल खंडेजोड, पोकॉ आकाश यादव, पोकॉ रफीक खान, पोकॉ यश ओगले, यांनी केली.

# अमरावतीत सामरा नगर मध्ये कुंटण खाण्यावर धाड

प्रतिनिधी ९ जुलै



**राजापेठ पोलिसांची कारवाई**

**अमरावती** : अमरावती येथील सामरा नगर येथे सुरू असलेल्या कुंटणखण्यावर राजापेठ पोलिसांनी कारवाई करून कुंटणखाना चालणाऱ्या महिलेला ताब्यात घेतले आहे.

पश्चिम बंगाल व मध्य प्रदेश राज्यातील महिलेला ग्राहकासह घेतले ताब्यात.

ही कारवाई आज दुपारी करण्यात आली. पोलीस स्टेशन राजापेठ हद्दीतील सामरा नगर येथे PITA ACT अंतर्गत कारवाई केली आहे.

कुंटणखाना चालवणाऱ्या एका पुरुष व महिलेसह इतर तिन महिलामिळून आले आहेत.

इतर तीन महिला ह्या पश्चिम बंगाल व मध्य प्रदेश राज्यातील रहिवाशी आहेत.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली राजापेठ चे ठाणेदार संदीप चव्हाण व त्यांच्या पथकाने केली आहे.

# तडीपार इसमास दहशत पसरवीत असतांना घातक शस्त्रासह ताब्यात

प्रतिनिधी ९ जुलै



**अमरावती** : तडीपारइसमास दहशत पसरवीत असतांना घातक शस्त्रासह ताब्यात घेतले आहे. ही कारवाई गुन्हे शाखा अमरावती शहर यांनी केली. तडीपार युवराज कुरवाणे रा. बेलपुरा, अमराती. हा बेलपुरा न्यु हायस्कुल शाळे मागिल मैदानमधे हाता मधे चाकु घेवुन सार्वजनिक ठिकाणी येणा-या जाणा-या लोकांना लोखंडी घातक चाकु दाखवुन दहशत निर्माण करीत आहे.

अशा मिळालेल्या माहीती वरून मा.पो.नि. अतुल वर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा येथिल पथकाने सदर इसम नामे युवराज विजय कुरखाणे, वय २२ वर्षे रा-बेलपुरा, अमरावती यास ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन एक लोखंडी चाकु जप्त करून नमुद तडीपार इसमांवर आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन राजापेठ येथे कलम ४/२५ आर्म अॅक्ट सहकलम १४२,१३५ मपोका प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. सदर ची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांचे मार्गदर्शनाखाली,पोलीस उपायुक्त परिमंडळ १ यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त परिमंडळ ०२ श्याम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय, प्रांजली सोनवणे यांचे मार्गदर्शनात केली आहे.

# सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांच्या तडजोडीसाठी विशेष लोकअदालत

## २१ ते २३ ऑगस्ट दरम्यान 'समाधान समारोह'

**अमरावती:** न्यायप्रक्रियेत नागरिकांचा सहभाग वाढवून 'न्याय आपल्या दारी' ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्याच्या उद्देशाने सर्वोच्चन्यायालयामार्फत'समाधान समारोह' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचा समारोप येत्या २१ ते २३ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित विशेष लोकअदालतीने होणार आहे.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा संमती-आधारित प्रक्रियेद्वारे, सलोख्याने वजलदगतीनेनिपटाराकरणेहाया विशेषलोकअदालतीचामुख्यउद्देश आहे. या माध्यमातून पक्षकारांना दीर्घकालीन न्यायप्रक्रियेतून मोठा दिलासा मिळणार असून, परस्पर सहमतीने वाद मिटविण्याची संधी उपलब्ध होणार आहे. जिल्ह्यातील सर्ववकील,पक्षकारतसेचसंबंधित हितधारकांनीया उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून वादांचे प्रभावी निराकरण करण्यासाठी सहकार्य करावे,असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष संजय सहारे यांनी केले आहे. या विशेष लोकअदालतीत पक्षकारांना प्रत्यक्ष उपस्थित राहण्याबरोबरच, आभासी (व्हर्च्युअल) पद्धतीने ऑनलाइन सहभागी होण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आलीआहे.

# कृषी पायाभूत सुविधा उभारणीसाठी अर्थसहाय्य

## 19 जून ते 20 जुलै दरम्यान विशेष अंमलबजावणी मोहीम

प्रतिनिधी ९ जुलै

**अमरावती:** शेतमालाचे मूल्यवर्धन, साठवणूक, प्रक्रिया आणि विपणन व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी केंद्र सरकारच्या कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेंतर्गत अर्थसहाय्य दिले जाते. यासाठी दि. 19 जून ते 20 जुलै दरम्यान विशेष अंमलबजावणी मोहीम राबविण्यात येणार आहे. यासाठी पात्र लाभार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ही योजना ऑगस्ट 2020 मध्ये आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत सुरू करण्यात आली असून, पीक काढणीनंतरची कृषी पायाभूत सुविधा आणि सामुदायिक शेतीसाठी आवश्यक सुविधांची निर्मिती करण्यासाठी सवलतीच्या कर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील पात्र वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी, संस्था, प्राथमिक कृषी पतसंस्था, सहकारी संस्था, कृषी उद्योजक, स्टार्टअप्स, स्वयंसहायता गट आणि कृषी क्षेत्रातील इतर पात्र संस्थांनी ऑनलाइन अर्ज करावे लागणार आहे.

कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेची विशेष अंमलबजावणीसाठी मोहीम दि. 19 जून ते 20 जुलै या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या मोहिमेदरम्यान जिल्ह्यात कार्यशाळा, बँक समन्वय बैठका आणि लाभार्थी मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात येणार आहेत.

या योजनेत मंजूर होणाऱ्या 2 कोटी रुपयांपर्यंतच्या कर्जावर 3 टक्के व्याज सवलत देण्यात येते. कर्जासाठी क्रेडिट गॅरंटी सुविधेचाही लाभ उपलब्ध आहे. यात गोदामे, शीतगृहे, पॅक हाऊस, ग्रेडिंग व सॉर्टिंग युनिट, प्राथमिक प्रक्रिया केंद्रे, कृषी लॉजिस्टिक्स, सायलो, रिपनिंग चेंबर, ई-मार्केट सुविधा, जैव इनपुट उत्पादन युनिट आणि कस्टम हायरिंग सेंटर आदी प्रकल्पांना या योजनेतून अर्थसहाय्य दिले जाणार आहे.

जिल्ह्यात संत्रा, केळी, कांदा, भाजीपाला आणि इतर नाशवंत कृषी उत्पादनांचे उत्पादन होते. तसेच कडधान्यामध्ये तूर, हरभरा व कापूस उत्पादित होतो. अशा उत्पादनांची गुणवत्ता, साठवण क्षमता, प्रक्रिया सुविधा आणि बाजारपेठेपर्यंत पोहोच अधिक प्रभावी करण्यासाठी आधुनिक गोडाऊन, दाल प्रक्रिया उद्योग, कापूस जिनिंग व प्रेसिंग, साफसफाई व ग्रेडिंग युनिट इत्यादी आधुनिक कृषी सुविधा उभारण्यासाठी ही योजना अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे पात्र संस्थांनी अर्ज करावेत, असे आवाहन आत्माच्या प्रकल्प संचालिका अर्चना निस्ताने यांनी केले आहे.

# जिल्हा नियोजन समितीची 18 जुलै रोजी बैठक

प्रतिनिधी ९ जुलै

**अमरावती:** जिल्हा नियोजन समिती बैठकीच्या नियोजनात बदल करण्यात आला असून, आता ही बैठक शनिवार, दि. 18 जुलै रोजी दुपारी 12 वाजता आयोजित करण्यात आली आहे. यापूर्वी ही बैठक दि. 12 जुलै रोजी होणार असल्याचे जाहीर करण्यात आले होते.

सुधारित वेळापत्रकानुसार सदर बैठक आता दि. 18 जुलै रोजी जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे होणार आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेत ही बैठक होणार आहे. बैठकीत जिल्ह्याच्या विविध विकासकामांचा आणि नियोजनाचा आढावा घेतला जाणार आहे.

# पारधी व फासे पारधी बांधवांनी 'पारधी पॅकेज' अंतर्गत घरकुल योजनेसाठी अर्ज करा

प्रतिनिधी ९ जुलै

**अमरावती:** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी अंतर्गत पारधी समाजाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी 'पारधी पॅकेज योजना सन २०२५-२६' जाहीर करण्यात आली असून, या अंतर्गत पात्र लाभार्थ्यांकडून विनामूल्य अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या योजनेचा लाभ केवळ अनुसूचित जमातीमधील पारधी व फासे पारधी समाजातील घटकांनाच घेता येणार आहे. या विशेष पॅकेजअंतर्गत प्रामुख्याने शहरी तसेच ग्रामीण भागातील पारधी समाजाच्या गरजू लाभार्थ्यांना स्वतःचे हक्काचे घर मिळावे, यासाठी घरकुल बांधकामाकरिता विशेष अर्थसाहाय्य मंजूर करण्यात आले आहे. या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या नागरिकांसाठी अमरावती जिल्ह्यातील विविध तालुक्यांच्या भौगोलिक रचनेनुसार अर्ज वाटप आणि स्वीकृती केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत.

धारणी, चिखलदरा, अंजनगाव सुर्जी व अचलपूर तालुक्यातील लाभार्थ्यांनी धारणी येथील प्रकल्प अधिकारी कार्यालयात संपर्क साधायचा आहे. तसेच नांदगाव खंडेश्वर, भातकुली, अमरावती, चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे व दर्यापूर तालुक्यातील नागरिकांनी अपर आयुक्त, आदिवासी विकास अमरावती यांच्या कार्यालयात आणि मोर्शी, वरुड, तिवसा व चांदूर बाजार तालुक्यातील लाभार्थ्यांनी धारणी प्रकल्पांतर्गत येणाऱ्या मोर्शी येथील उप कार्यालयात आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. या योजनेचे अर्ज पूर्णपणे विनामूल्य उपलब्ध अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख २४ जुलै २०२६ ही राहणार आहे.

योजनेच्या पारदर्शकतेसाठी प्राप्त सर्व अर्जांची प्रथम संगणकीय यादी तयार करण्यात येईल. त्यानंतर सर्व कागदपत्रांची तपासणी करून पात्र व अपात्र उमेदवारांची स्वतंत्र यादी जाहीर केली जाईल व अंतिम निवड 'ईश्वर चिठ्ठी' (लकी ड्रॉ) पद्धतीने होईल. लाभार्थी निवडताना समाजातील सर्वात गरजू घटकांचा विचार केला जाणार असून यामध्ये दारिद्र्यरेषेखालील (बीपीएल) लाभार्थी, दिव्यांग व्यक्ती आणि विधवा महिलांना प्रामुख्याने प्रथम प्राधान्य दिले जाईल.

# आषाढी एकादशीसाठी पंढरपूरसाठी 254 जादा बसेस

प्रतिनिधी ९ जुलै

**अमरावती:** आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर येथे दि. 20 ते 30 जुलै दरम्यान होणाऱ्या आषाढी यात्रेसाठी परिवहन महामंडळाने तयारी केली आहे. भाविकांचा प्रवास सुलभ व्हावा यासाठी जिल्ह्यातील आगारातून एकूण 254 जादा बसेस सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील अमरावती, बडनेरा, परतवाडा, वरुड, चांदूर रेल्वे, दर्यापूर, मोर्शी आणि चांदूर बाजार या आगारातील बसस्थानकावरून प्रवाशांच्या उपलब्धतेनुसार पंढरपूरसाठी जादा बसेस सोडल्या जातील. एखाद्या गावातून 40 किंवा त्यापेक्षा जास्त प्रवासी उपलब्ध असल्यास थेट त्या खेड्यातून पंढरपूरसाठी विशेष बस सोडण्यात येईल. यासाठी भाविक, प्रवासी किंवा सरपंचांनी नजीकच्या आगाराशी संपर्क साधावा लागणार आहे. तसेच, पंढरपूरहून परत येणाऱ्या भाविकांसाठी परतीच्या आरक्षणाची सोयही महामंडळाने केली आहे. भाविकांना परतीचा प्रवास अधिक सुलभ व्हावा आणि संपर्क करणे सोपे जावे, म्हणून यावर्षी एका विशेष उपक्रमांतर्गत प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या बसच्या चालक आणि वाहकांची नावे व मोबाईल नंबर बसमध्ये ठळकपणे प्रदर्शित केले जातील. अमरावती 36, बडनेरा 36, परतवाडा 30, वरुड 36, चांदूर रेल्वे 21, दर्यापूर 30, मोर्शी 32, चांदूर बाजार 33 अशा एकूण 254 बसेस सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. भाविकांच्या सोयीसाठी प्रमुख मार्ग आणि त्यांचे प्रवास भाडे निश्चित करण्यात आले आहे. यात अमरावती - पंढरपूर (मार्गे वाशिम, परभणी) 1046 रूपये, दर्यापूर - पंढरपूर (मार्गे मुर्तिजापूर, परभणी) 1024 रूपये, परतवाडा - पंढरपूर (मार्गे अमरावती, परभणी) 1135 रूपये, वरुड - पंढरपूर (मार्गे अमरावती, परभणी) 1212 रूपये, चांदूर रेल्वे - पंढरपूर (मार्गे अमरावती, परभणी) 1112 रूपये, मोर्शी - पंढरपूर (मार्गे अमरावती, परभणी) 1146 रूपये, चांदूर बाजार - पंढरपूर (मार्गे अमरावती, परभणी) 1124 रूपये भाडे निश्चित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील भक्त आणि वारकऱ्यांनी नजीकच्या आगारात चौकशी करून बसेस आरक्षित कराव्यात आणि सुरक्षित शासकीय बस सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभाग नियंत्रक सचिन डफळे यांनी केले आहे.

# रहाटगाव मुख्य रस्त्याची दुरवस्था

## नगरसेवक विनोद तानवैस यांच्या पुढाकाराने महापौर अन् सभागृह नेत्यांकडून थेट 'स्पॉट इन्स्पेक्शन'

प्रतिनिधी ९ जुलै



**अमरावती** : १५ जुलैच्या आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर प्रशासन खडबडून जागे; प्रगती शाळेचे विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिकांचे निवेदन दिले.

रहाटगाव येथील मुख्य रस्त्यावरील खड्डे आणि चिखलामुळे नागरिकांना सहन कराव्या लागत असलेल्या त्रासाची गंभीर दखल घेत, नगरसेवक तथा स्थायी समिती सदस्य विनोद तानवैस यांनी अत्यंत आक्रमक पाऊल उचलले आहे. १५ जुलै रोजी नागरिकांच्या वतीने देण्यात आलेल्या आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर, तानवैस यांनी थेट सन्माननीय महापौर श्रीचंदजी तेजवानी आणि सभागृह नेते. चेतन गावंडे यांना सोबत घेऊन रहाटगाव परिसराचा प्रत्यक्ष पाहणी दौरा (स्पॉट इन्स्पेक्शन) केला.

या पाहणी दौऱ्यादरम्यान प्रगती शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, पालक वर्ग आणि स्थानिक नागरिकांच्या वतीने प्रशासनाला एक निवेदन सादर करून आपल्या तीव्र भावना व्यक्त करण्यात आल्या.

### ...तर प्रशासनाला धारेवर धरू: विनोद तानवैस यांचा इशारा

गेल्या दोन वर्षांपासून या रस्त्याचे काम रखडलेले आहे. त्यामुळे शालेय विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या प्रशासकीय दिरंगाईवर नगरसेवक विनोद तानवैस यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, "रहाटगावच्या नागरिकांचा जीव महत्त्वाचा असून, प्रशासनाच्या सुस्त कारभारामुळे त्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. जर तातडीने या समस्येचे निराकरण झाले नाही, तर नागरिकांच्या सोबत राहून आम्ही स्वतः प्रशासनाला धारेवर धरू."

### प्रशासनाकडून कामाचे आश्वासन

लोकप्रतिनिधींचा आक्रमक पवित्रा आणि नागरिकांचा वाढता संताप पाहता, उपस्थित प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तात्काळा तात्पुरत्या दुरुस्तीचे काम हाती घेण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र, दिलेल्या आश्वासनानुसार तातडीने योग्य पावले न उचलल्यास नागरिक आणि लोकप्रतिनिधी मिळून पुढील तीव्र निर्णय घेतील, असा इशारा यावेळी देण्यात आला.

या पाहणी दौऱ्याप्रसंगी रहाटगाव परिसरातील नागरिक, प्रगती शाळेचे शिक्षक, विद्यार्थी आणि मोठ्या संख्येने स्थानिक रहिवासी उपस्थित होते.

### महापौर आणि सभागृह नेत्यांचे अधिकाऱ्यांना कडक निर्देश

पावसाळ्यात हा रस्ता अधिक धोकादायक बनून कोणताही मोठा अपघात घडू नये, यासाठी महापौर श्रीचंदजी तेजवानी आणि सभागृह नेते श्री. चेतनजी गावंडे यांनी घटनास्थळावरूनच संबंधित अधिकारी व प्रशासनाला स्पष्ट आणि कडक निर्देश दिले. रस्त्यावरील खड्डे तात्काळ बुजवून चिखल हटवण्याचे आणि प्रत्यक्ष रस्ते कामाला तातडीने गती देण्याचे आदेश यावेळी अधिकाऱ्यांना देण्यात आले.



# फोकस

● अतिष देशमुख @ वाशीम ●

## कृषी मंत्र्याच्या 'पालक' जिल्ह्यात...



# बळीराजावर अन्याय, कधी मिळणार न्याय !

* पेरणी पुर्वी अनुदानाचे बियाणे मिळत नाही.
* पेरणीसाठी बँक वेळेवर कर्ज देत नाही.
* बियाण्यातून फसवणूक, कारवाई नाही
* फसवणुकीनंतर मदतही नाही, न्याय नाही.
* खऱ्या शेतकऱ्यांपर्यंत योजना पोहोचत नाही.
* हजारो तक्रारी करूनही दखल नाही.
* अधिकारी सन्मानाची वागणूक देत नाही.
* दुबार तिबार पेरणीच्या संकटात साथ नाही.
* कागदावरच्या योजना प्रत्यक्षात भेटत नाही.
* नुकसानीचे पंचनामे नाही, सर्व्हे नाही.
* निसर्गासोबत अधिकाऱ्यांचीही साथ नाही.
* पाणी आहे पण वीज मिळत नाही .
* पीक विम्याची रक्कम मिळाली नाही.

## शासनाची 'अवकळा', जीवनाचा 'उन्हाळा'

सदैव संकटात नैसर्गीक संकटाबरोबर कृत्रीम संकाटाने बळीराजा दरवर्षी होरपळून निघत आहे. अतिवृष्टीमुळे हातचे आलेले पीक नष्ट झाले. शासनाने घोषीत केलेली मदत अद्यापही मिळाली नाही. जी मिळत आहे ती अत्यल्प आहे. पेरणी पूर्वी बळीराजाला अनुदानाचे बी बियाणे मिळत नाही. कृत्रीम खत टंचाईला सामोरे जावे लागते. त्यातच बोगस बियाण्यातून फसवणूक होते. दुबार तिबार पेरणीचे संकट ओढावते. एवढे करूनही ऐन हंगामाच्या तोंडावर आलेला हातचा आलेला घास नापिकीमुळे जाते. बोगस बियाणे प्रकरणी ५ हजार तक्रारी करून कारवाई नाही झाली आणि मदतही नाही झाली अतिवृष्टीचा सर्व्हे कागदावरच झाला. मात्र शासनाने जाहीर केलेली मदत वाशीम जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळालाच नाही. या सर्व गोष्टीला जिल्ह्यातील अधिकारीच जबाबदार आहे. शासनानेही त्यावर कहरच केला. पीक विम्याचे पैसेही शेतकऱ्यांना अद्याप मिळाले नाही. सोयाबीनचे अत्यल्प उत्पादन झाले. वरून शेतमालाचे भाव व्यापाऱ्यांनी पाडले. इतर जिल्ह्यात पीक विम्याचे पैसे मिळाले असतांना अद्यापही वाशीम जिल्ह्यातील शेतकरी पीक विम्यापासून वंचित आहेत. शासकीय योजना खऱ्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नसल्याने शासनाची अवकळा अन् जीवनाचा उन्हाळाच झाला आहे . कृषी मंत्र्याच्या पालक जिल्ह्यातच बळीराजावर अन्याय होत आहे. त्यामुळे न्याय कधी मिळणार अशी अपेक्षा बळीराज करीत आहेत.









# शेतकऱ्यांचे लुटारू सक्रीय, अधिकारी निष्क्रीय...

### खताची लिंकींग थांबवा, अन्यथा आंदोलन - दामुअण्णा इंगोले

बोगस बियाणे तथा बनावट रासायनिक खते माथी मारून शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक लुबाडणूक करणारी लुटारूंची टोळी पून्हा एकदा जिल्ह्यात सक्रीय झाली असल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे. तर अधिकारी निष्क्रीय दिसत आहेत. आज डिएपी खताची रेल्वेची रॅक आली असून खताबरोबर लिंकींग करून खते विकण्याच्या तयारीत लूटारू टोळी तयारीत आहे.

मागील वर्षी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे विदर्भ प्रमुख दामुअण्णा इंगोले यांनी अरिहंत कंपनीच्या बोगस सुपर फॉसेट खंताविरोधात कृषी विभागाकडे केलेल्या तक्रारीने ही बाब उजेडात आणली होती. यावेळेस कृषी विभागाने वेळेवर सजगपणा न दार्खविल्यास शेतकरी अडचणीत येण्याची शक्यता नाकारता येत नाही. बळीराजाने पेरणी पुर्व मशागत करून बी-बियाणे खरेदीला सुरूवात करणार आहे. त्यामुळे त्यांनी फसवणुकीपासून सावध राहावे. अगोदरच डिझेल टंचाईने शेतकरी हैराण झाला आहे. अनेक संकटाला तोंड देत जिल्ह्यातील शेतकरी आता शेतीच्या कामाला लागला असून चांगला पाऊस पडण्याचे संकेत दिल्याने बि-बियाण्याच्या खरेदीला सुरूवात केली आहे. त्यामुळे आजमितीा शेतकऱ्यांची मशागतीसोबतच खते व बियाणे खरेदी करण्याची लगबगही सुरू झाली आहे. नेमका याच लगबगीचा फायदा घेत बाजारात शेतकऱ्यांना लुटण्यासाठी काही लुटारुंची टोळी सक्रीय झाली आहे. अधिक पैसा कमविण्याच्या हव्यासातून सदर लुटारू बोगस बियाणे किंवा खते शेतकऱ्यांच्या माथी मारून त्यांची आर्थिक पिळवणूक करण्याचा गोरखधंदा या लुटारुंकडून सुरू असते. टिएल कंपनीच्या बोगस सोयाबीन बियाणे सुपर फॉस्फेट विक्रीतून हा बोगसपणा पून्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. सदर कंपनीच्या मिश्र खतांचे नमुने गुणवत्ता तपासणीत निकृष्ठ असल्याचे समोर आले असतानाही त्याची विक्री सर्रास सुरू आहे.

तर शेतकऱ्यांच्या फसवणुकीसाठी डीएपी खातासोबत नॅनो व सल्फर खाताची लिंकींग सुरू असून ती थांबविण्याची मागणी शेतकरी नेते दामुअण्णा इंगोले यांनी केली आहे. केंद्र सरकारच्या अनुदानानंतर खतांच्या किमती कमी झाल्या असतानाही काही दुकानदार वाढीव किमतीतच विक्री करीत आहेत. कृषी विभागाने हा सर्व प्रकार थाबविणे गरजेचे आहे.

## *निकृष्ट खते व बियाण्यांची सर्रासपणे विक्री * बळीराजा पुन्हा अडचणीत येण्याची शक्यता * प्रशासनाने वेळीच दखल घ्यावी

### चार वर्षीच्या तक्रारीवर कारवाई नाही

कोरोनाच्या संकटात मागील चार वर्षापूर्वी बोगस बियाण्यातून शेतकऱ्यांची मोठी फसवणूक झाली होती. दुबार-तिबार पेरणीनंतरही शेतकऱ्यांनी पेरलेले बियाणे उगवलेच नाही. त्यामुळे निराश झालेल्या शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे तब्बल ५ हजार तक्रारी केल्या मात्र, कंपण्या व कृषी सेवा केंद्राच्या हातातील बाहूली झालेल्या कृषी विभागाला यामध्ये काही गांभिर्य दिसले नाही. चार वर्ष लोटले तरी या तक्रारींवर काहीच कारवाई झाली नाही ही वस्तूस्थिती आहे. बोगस बियाण्यांमधून झालेली आर्थिक हानी भरून निघावी यासाठी शेतकऱ्यांना मदतीची आस होती परंतु, त्यांचा भ्रमनिरास झाला.



### बि-बियाणे व खतही मिळेना बँक पीक कर्जही देईना काय करावे कळेना...

कृतिम खत टंचाई निर्माण करून शेतकऱ्यांना अडचणीत आणून लूटण्याचे षडयंत्र आखणे सुरू आहे. बियाणे ही मिळेना, कर्ज जाहीर करूनही बँक पीक कर्ज देईना, बळीराजाला काय करावे कळेना, असे झाले आहे. निसर्गाची साथ साथ मिळत नसल्याने वारंवार संकटाचा सामाना करणाऱ्या बळीराजाला आता पुन्हा खत बि-बियाण्यासाठी वनवन भटकावे लागत आहे. मान्सुन चांगला बरसनार असल्याने समाधानी असलेल्या शेतकऱ्यांना खतासाठी व बि-बियाण्यासाठी फिरावे लागत आहे. शेतीच्या बांधावर खते उपलब्ध करून देण्याची योजना कागदावरच आहे.




## थोडक्यात

### अतिरिक्त सीईओ किरण कोवे यांनी दिले, ३० दिवसात १०० गावे मॉडेल करण्याचे लक्ष्य !



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत जिल्ह्यातील जास्तीत जास्त गावे ओडीएफ प्लस मॉडेल करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी दिले. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गणेश कोवे यांनी जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचा आढावा घेतला.

मागील सहा महिन्यापासून एकही गाव मॉडेल घोषित न झाल्यामुळे त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ओडीएफ प्लस मॉडेल साठी आवश्यक असलेली प्रलंबित कामे करण्यास टाळाटाळ करणाऱ्यांची सुनावनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात लावण्याचे निर्देश त्यांनी दिले.


# शालेय पोषण, विद्यार्थ्यांचे शोषण, भ्रष्ट शासन, काळ्या बाजारात राशन !

## २०१८ ते २०२५ वाशिम जिल्ह्यात विद्यार्थ्यांच्या ताटातील घासच गायब, पावत्यांमधील धक्कादायक तफावत उघड

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशिम जिल्ह्यातील शालेय पोषण आहार योजनेत कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचाराचा संशय अधिक गडद होत असून, आता समोर आलेल्या पोहोच पावत्यांनी संपूर्ण प्रशासन हादरवून सोडले आहे. विद्यार्थ्यांना पोषण देण्यासाठी शासनाकडून पाठविण्यात आलेल्या धान्याचा मोठ्या प्रमाणावर अपहार झाल्याचे धक्कादायक चित्र या कागदपत्रांतून स्पष्ट होत आहे. विशेष म्हणजे, एकाच शाळेसाठी, एकाच कालावधीतील आणि जवळपास एकाच स्वरूपाच्या पावत्यांमध्ये धान्याच्या वजनात प्रचंड फरक दिसून येत असल्याने हा प्रकार केवळ लेखनिक चूक नसून संगनमताने रचलेला 'शालेय पोषण आहार घोटाळा' असल्याची चर्चा आता जोर धरू लागली आहे. ' जगदंबा एंटरप्रायझेस बीड ' यांच्या नावाने तयार करण्यात आलेल्या पावत्यांमध्ये शासकीय तांदूळ वाहतुकीचे वेगवेगळे आकडे नमूद करण्यात आले आहेत. उपलब्ध पाच पावत्यांमधूनच तब्बल १००० किलोपेक्षा अधिक तांदळातील तफावत समोर आली आहे. ही धान्याची ही धान्याची तफावत नेमकी कुठे गेली? विद्यार्थ्यांच्या ताटातील घास कोणाच्या गोदामात पोहोचला? असा संतप्त सवाल आता वाशिम जिल्ह्यातील नागरिकांच्या मुखातून सूर धरू लागले आहेत. विशेष बाब म्हणजे सर्व पावत्यांवर संबंधित मुख्याध्यापकांचे माघारी खोट्या शिक्के व स्वाक्षऱ्या आहेत. त्यामुळे या प्रकारात शाळांचे मुख्यध्यापक वगळता केवळ पुरवठादारच नव्हे तर काही अधिकारी, कर्मचारी आणि संबंधित यंत्रणांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात आली आहे. एकाच कालावधीतील दोन वेगवेगळ्या पावत्यांमध्ये एवढा मोठा फरक कसा? जर एक पावती खरी असेल तर दुसरी खोटी कोणाच्या सांगण्यावरून तयार करण्यात आली? आणि जर दोन्ही अधिकृत असतील तर शासनाची फसवणूक कोणी केली? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

तक्रारदारांनी हा केवळ सुरुवातीचा पुरावा असल्याचे सांगितले असून, अशाच प्रकारच्या शेकडो पावत्या, नोंदी आणि पुरावे आपल्याकडे असल्याचा दावा केला आहे. जर या सर्व कागदपत्रांची निष्पक्ष चौकशी झाली तर वाशिम जिल्ह्यातील शालेय पोषण आहार योजनेतील मोठा भ्रष्टाचार उघड होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



### हा घ्या पुरावा... तफावत असलेल्या पावत्या



मुख्याध्यापकांचे माघारी खोटे सह्या व शिक्षा मारून गायब करण्यात आलेला तांदूळ एका पावतीत : २१०० किलो तांदूळ तर दुसऱ्या पावतीत : १२५० किलो तांदूळ म्हणजेच : तब्बल ८५० किलो तांदळाचा फरक याचप्रमाणे दुसऱ्या संचातील पावत्यांमध्ये एका पावतीत ३५० किलो, तर दुसऱ्यात फक्त २०० किलो म्हणजे आणखी : १५० किलो तांदूळ गायब ङडाळी, मसाले आणि कडधान्यांमध्येही मोठा फरक एका पावतीनुसार :तूरडाळ - ७० किलो, हरभरा - ७५ किलो, मूगडाळ - १५० किलो, वाटाणा - १३५ किलो तर दुसऱ्या पावतीत : तूरडाळ - ५० किलो, हरभरा - ५५ किलो मूगडाळ - १०० किलो वाटाणा - ८५ किलो म्हणजेच : तूरडाळ २० किलो कमी, हरभरा २० किलो कमी, मूगडाळ ५० किलो कमी वाटाणा ५० किलो कमी इतकेच नव्हे तर मसाले, जिरे, मोहरी, हळद पावडर यामध्येही फरक असल्याचे दिसून येत आहे.

# 16 वर्षांच्या लढ्याला यश; शेतकऱ्याला जमिनीचा ताबा!

## सावकारी व्यवहार रद्द ■ ताब्यानंतर तत्काळ पेरणी!

प्रतिनिधी ९ जुलै



**खामगाव :** तब्बल १६ वर्षांच्या कायदेशीर संघर्षानंतर आमसरी (ता. खामगाव) येथील गट क्रमांक ६३, क्षेत्र २ हेक्टर ३६ आर. या शेतीचा प्रत्यक्ष ताबा अर्जदारांचे वारस अंबादास देवीदास हिंगणे व अन्य पाच वारसदारांना सोमवारी (दि. ६) महसूल, सहकार व पोलिस प्रशासनाच्या उपस्थितीत देण्यात आला. महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ च्या कलम १८(२) अंतर्गत जिल्हा उपनिबंधक, सहकारी (सावकारी), बुलढाणा यांच्या आदेशानुसार पंचनामा करून ही कारवाई करण्यात आली.

प्रकरण क्रमांक ३२५/२०२१ मधील मूळ अर्जदार दिवंगत देवीदास राजाराम हिंगणे व दिवंगत भिकाबाई देवीदास हिंगणे यांच्या वारसांमध्ये अंबादास देवीदास हिंगणे यांच्यासह अन्य पाच वारसदारांचा समावेश आहे. तर गैरअर्जदार म्हणून अब्दुल सत्तार शेख इसाक, महम्मद फईम महम्मद अश्रफ, उमेश मधुकर बढे, हरिदास नामदेव भिसे, शीतल हरिदास भिसे, एस. आर. काळमेघ (तलाठी कार्यालय, खामगाव) आणि नरेश जगन्नाथ चौकशे यांचा समावेश होता. या प्रकरणात ८ सप्टेंबर २००९ रोजी झालेला खरेदी व्यवहार, तसेच दस्त क्रमांक २८२/२००९ आणि बक्षीसपत्र क्रमांक ३५५३ हे संबंधित आदेशानुसार रद्द करण्यात आले. त्यानंतर ३० जून व १ जुलै २०२६ रोजी फेरफार क्रमांक १३०९ नुसार ७/१२ उतारा व नमुना ८-अ मधील नोंदी रद्द करून संबंधित जमीन मूळ अर्जदारांच्या वारसांच्या नावे मंजूर करण्यात आली.

तत्कालीन जिल्हा उपनिबंधक महेंद्र चव्हाण आणि जिल्हा उपनिबंधक जी. पी. साबळे यांच्या आदेशानुसार सहायक निबंधक, सहकारी संस्था, खामगाव येथील गारोळे यांना कारवाईसाठी प्राधिकृत करण्यात आले होते. त्यांच्या निर्देशानुसार आर. व्ही. खराटे, ए. एच. भांबेरे आणि एल. एच. लमये यांनी पंचनामा करून शेतीचा प्रत्यक्ष ताबा वारसांकडे सुपूर्द केला.

कारवाईदरम्यान खामगाव तहसीलदार सुनील पाटील यांच्या आदेशानुसार आर एस. बल्हाळे आणि के. आर. जाधव उपस्थित होते, तसेच पोलिस अधीक्षक नीलेश तांबे यांच्या आदेशानुसार पोलिस निरीक्षक अशोक काकविपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार सांगळे, पोलिस अंमलदार संतोष कदम, प्रेमसिंग पवार, वसतकार, पोलिस पाटील रामदास कुटे आणि महसूल सेवक सुरेश लाहुडकार यांनी बंदोबस्ताची जबाबदारी सांभाळली.

### त्याच दिवशी पेरणी

ताब्यानंतर ट्रॅक्टरने नांगरणी, वखरणी करून बैलजोडीच्या साहाय्याने त्याच दिवशी पेरणी करण्यात आली. या प्रकरणात सन २०१४ पासून विधितज्ज्ञ ॲड. गजानन बोचे (अकोट) यांनी अर्जदारांची बाजू मांडली. यावेळी रमेश पाटील (अकोट प्रदेशाध्यक्ष, सावकारी बहुउद्देशीय संस्था), कायदेतज्ज्ञ शंतुन पाटील, विकास वाघ, गजानन इंगळे, कैलास ढोले, भगवान धांडे, पत्रकार पद्माकर धुरंधर, भास्कर कुटे, शालिग्राम कुटे, गोपाल तायडे, गजानन कोळस्कार, सुधाकर धुरंधर, अतुल धुरंधर, योगेश धुरंधर, डिगांबर बेलोकार, प्रमोद घाटे यांच्यासह जिल्हाभरातील शेतकरी उपस्थित होते.

# ग्रामीण विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाची नवी दिशा-डॉ. पुरी

प्रतिनिधी ९ जुलै



**खामगाव :** खामगाव तालुक्यातील काळेगाव येथील आशिरा इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज उपविभागीय अधिकारी डॉ. ला रामेश्वर पुरी यांनी मंगळवारी (दि. ७ जुलै) भेट देऊन संस्थेतील शैक्षणिक सुविधा व विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची पाहणी केली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या डिजिटल शिक्षण सुविधांचे त्यांनी विशेष कौतुक करत संस्थेच्या कार्याचे अभिनंदन केले.

भेटीदरम्यान डॉ. पुरी यांनी आधुनिक डिजिटल क्लासरूम, तंत्रज्ञानाधारित अध्यापन पद्धती तसेच विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा यांचे प्रत्यक्ष अवलोकन केले. ग्रामीण विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यामुळे त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल आणि स्पर्धा परीक्षांमध्येही ते उल्लेखनीय यश संपादन करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मार्गदर्शन करताना डॉ. पुरी म्हणाले की, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानाच्या माध्यमातून घडवून आणलेला हा सकारात्मक बदल निश्चितच प्रेरणादायी असून इतर शैक्षणिक संस्थांसाठीही आदर्श ठरेल, असे म्हटले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. अनिल अमलकार, मंडळ अधिकारी श्री. चौधरी, प्रशांत अमलकार, प्राचार्य निलेश घाटे, अशोक बोदळे, अमोल इंगळे, अरविंद खंडारे, सोनवणे सर, गोपाल तायडे, अमोल भोलनकर यांच्यासह शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. प्रशासनाकडून संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेची आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांची घेतलेली दखल ही संस्थेसाठी अभिमानाची बाब असल्याची भावना यावेळी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली

# ॲल्युमिनियम तार चोरीला; 33 हजारांचे नुकसान

प्रतिनिधी ९ जुलै

## ग्रामीण पोलिसांत अज्ञाताविरुद्ध गुन्हा

**मलकापूर;** तालुक्यातील उमाळी शिवारात महावितरणच्या एलटी (लो-टेन्शन) वीजवाहिनीवरील ॲल्युमिनियम तार चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी मलकापूर ग्रामीण पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

सहायक अभियंता श्रीनिवास चंद्रशेखर पूर्णेकर (वय ४०, शाखा दाताळा-१) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, भरत पाटील यांच्या उमाळी शिवारातील

शेतात असलेल्या ६३ केव्हीए क्षमतेच्या डीपीवरील एलटी वीजवाहिनीची सुमारे ५,७६० मीटर लांबीची ॲल्युमिनियम तार अज्ञात चोरट्यांनी कटरच्या साहाय्याने कापून चोरून नेली. या चोरीमुळे महावितरणचे सुमारे ३३ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

ही घटना ५ जुलै रोजी रात्री ११ ते ६ जुलै रोजी सकाळी ६ वाजेदरम्यान घडली. याप्रकरणी ७ जुलै रोजी मलकापूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याची नोंद सहायक पोलिस उपनिरीक्षक (एएसआय) नितीन बोरले यांनी केली असून, पुढील तपास एएसआय बाळू टाकरखेडे करीत आहेत.

# जुन्या वादातून वृद्धाला शिवीगाळ

प्रतिनिधी ९ जुलै

**खामगाव :** शेजारील जुन्या वादातून घरासमोर येऊन अश्लील शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना मंगळवारी दि. ७ जुलै रात्री ९ वाजताच्या सुमारास पिंप्री गवळी येथे घडली.

तक्रारीनुसार, पांडुरंग भिकाजी मोरे (५७, रा. पिंप्री गवळी) व राहुल संतोष मोरे (रा. पिंप्री गवळी) यांची घरे शेजारी असून, त्यांच्यात पूर्वीपासून वाद आहे. घटनेच्या दिवशी राहुल संतोष मोरे हा फिर्यादीच्या घरासमोरील सार्वजनिक रस्त्यावर आला. घराला लावलेली ग्रील स्वतःची असल्याचा दावा करत त्याने फिर्यादीला अश्लील शिवीगाळ केली. तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या तक्रारीवरून खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात राहुल संतोष मोरे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास किरण राऊत करीत आहेत.

# गाडेगाव खु. मध्ये काळवीट शिकार, २ जणांना अटक

प्रतिनिधी ९ जुलै

**जळगाव जा.;** वनविभागाने गुप्त माहितीच्या आधारे गाडेगाव खुर्द येथे केलेल्या कारवाईत काळवीटाची शिकार करणाऱ्या ३ जणांपैकी २ जणांना अटक केली आहे.

६ जुलै रोजी वनपाल व्ही. बी. पाश्रीकर यांच्या नेतृत्वातील पथकाने आरोपींच्या घरावर छापा टाकला असता काळवीटाचे शिजवलेले मांस व जिवंत तितर पक्षी आढळून आले.

शंकर दामा मुंढे, शिवहरी दामा मुंढे अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. तर देविदास दामा मुंढे हा फरार आहे. काळवीट हा वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ च्या शेड्युल-१ मधील अतिसंरक्षित प्राणी आहे. अटक केलेल्या आरोपींना ७ जुलै रोजी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने ४ दिवसांची वनकोठडी सुनावली. वनविभागाने नागरिकांना वन्यप्राणी शिकारीची माहिती मिळाल्यास तात्काळ कळवण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले आहे.

# महावीर चौकात विद्युत तारा झाडाच्या विळख्यात

## मान्सूनपूर्व छाटणीवर प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी ९ जुलै

**खामगाव :** खामगाव शहरातील महावीर चौक परिसरात बरालिया ट्रेडर्ससमोर उभे असलेले मोठे झाड थेट विद्युत प्रवाहित तारांमध्ये अडकले असून त्यामुळे गंभीर अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे.

मान्सूनपूर्व देखभाल व झाडांची छाटणी करण्यात येते, मात्र हे धोकादायक झाड अद्यापही तसेच असल्याने महावितरणच्या कामकाजावर नागरिकांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

पावसाळ्यात जोरदार वारे, मुसळधार पाऊस किंवा फांद्या तुटल्यास वीजपुरवठा खंडित होण्याबरोबरच शॉर्टसर्किट, आग लागणे किंवा जीवितहानीचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने पाहणी करून झाडाची सुरक्षित छाटणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

"मान्सूनपूर्व मेंटेनन्समध्ये हे झाड अधिकाऱ्यांना दिसले नाही का?" असा सवालही परिसरातील नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# विष प्राशन करून शेतकऱ्याची आत्महत्या

प्रतिनिधी ९ जुलै

**निमगाव :** विष प्राशन करून शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची घटना अलमपूर तालुका नांदुरा येथे ७ जुलै रोजी रात्री उशिरा उघडकीस आली. यामध्ये येथील अलमपूर शेतकरी संजय प्रल्हाद सुलतान यांनी आपले राहते घरात ७ जुलै चे रात्री विष प्राशन केले असता त्यांना सामान्य रुग्णालय खामगाव येथे उपचारार्थ नेले असता तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ निमजे यांनी त्यांना मृत घोषित केले.

मृतक संजय सुलतान यांचे कडे ३ एकर शेती असून त्यांचेकडे ग्रामसेवा सोसायटी अलमपूरचे २०२१ चे ७१,१५० रुपये थकीत कर्ज व ४३६३३ रुपये व्याज थकीत असल्याने सतत होणारी नापिकी आणि त्यातच कर्जबाजारीपणाला कंटाळून त्यांनी आत्महत्या केल्याचे मृतकाचे भाऊ राजेंद्र प्रल्हाद सुलतान यांनी सांगितले.

सरकारच्या कर्जमाफी योजनेत त्यांना कर्ज सूट होणार नसल्याचे त्यांना माहीत असल्याने त्यांनी सदर टोकाचा निर्णय घेतल्याचे समजते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, भाऊ असा बराच आप्त परिवार असून सदर घडलेल्या घटनेमुळे पंचक्रोशीत शोककळा पसरली आहे. ८ जुलै रोजी सकाळी त्यांचे शव विच्छेदन करून अत्यंत शोकाकुल वातावरणात त्यांचे मूळ गाव अलमपूर येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. ७ जुलै चे रात्री मृतक संजय सुलतान हे आपल्या पत्नीला नांदुरा येथील एका समारंभात सोडून घरी परतल्यानंतर त्यांनी विष प्राशन केल्याचे समजते. मृतक संजय सुलतान हे ग्रामपंचायत अलमपूरचे ग्रामपंचायत सदस्य होते. मागील ६ महिन्यातच त्यांचा नुकताच कार्यकाळ संपलेला होता.

# शिवसेनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश; पिंप्री गवळी येथे भगवानजी बर्डे यांनी दिला 20 फूट रुंदीचा मोफत रस्ता

## तालुकाप्रमुख राजेंद्र बघे यांच्या प्रयत्नांमुळे मार्ग मोकळा; आदिवासी व बौद्ध बांधवांना मोठा दिलासा

प्रतिनिधी ९ जुलै

**खामगाव :** पिंप्री गवळी येथील आदिवासी व बौद्ध बांधवांच्या दळणवळणाचा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र बघे यांनी या प्रश्नासाठी वेळोवेळी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश येत प्रतिष्ठित नागरिक व उद्योजक भगवानजी बर्डे यांनी स्वतःच्या एन.ए. झालेल्या शेतातून २० फूट रुंदीचा व सुमारे ४०० मीटर लांबीचा रस्ता समाजहितासाठी विनामूल्य उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला. माहितीनुसार, सुरुवातीला भगवानजी बर्डे हे रस्ता देण्यास तयार नव्हते. मात्र, राजेंद्र बघे यांनी त्यांची अनेक वेळा भेट घेऊन नागरिकांची अडचण समजावून सांगितली. या विषयावर सातत्याने संवाद साधत समाजहिताचा विचार करण्याची विनंती केली. अखेर नागरिकांच्या गैरसोयीची दखल घेत भगवानजी बर्डे यांनी सकारात्मक निर्णय घेत रस्त्यासाठी जागा उपलब्ध करून दिली. या रस्त्यामुळे परिसरातील आदिवासी व बौद्ध बांधवांसह शेतकरी, विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांची ये-जा अधिक सुलभ होणार आहे. विशेषतः पावसाळ्यात होणाऱ्या अडचणी कमी होण्यास मदत होणार असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. भगवानजी बर्डे यांच्या या निर्णयाचे शिवसेना पदाधिकारी व ग्रामस्थांनी स्वागत केले असून, समाजहिताला प्राधान्य देत त्यांनी घेतलेल्या भूमिकेचे कौतुक केले आहे. तसेच हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र बघे यांच्या प्रयत्नांचेही नागरिकांनी अभिनंदन केले. यावेळी ग्रामस्थांनी भगवानजी बर्डे यांचे मनःपूर्वक आभार मानत, गावाच्या विकासासाठी अशा सकारात्मक निर्णयांची भविष्यातही अपेक्षा व्यक्त केली.यावेळी प्रल्हाद गावंडे, पंजाबराव इंगळे,नारायण गावंडे,प्रकाश सोनोने,गजानन मोरे, लीलाधर मोरे,पुरुषोत्तम पिंपळकार,सचिन पवार,कृष्णा वाघ,ज्ञानेश्वर मोरे, बाबुराव इंगळे,संजय इंगळे,गोरख इंगळे, यांच्यासह पिंप्री गवळी येथील महिला भगिनी व पुरुष मंडळी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

# अमडापूर येथे सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा प्रशिक्षण

प्रतिनिधी ९ जुलै

**बुलढाणा :** राज्य शासनाच्या माझे गाव आरोग्य संपन्न गाव अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'कसं काय?' मोहिमेच्या माध्यमातून सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी चिखली तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र अमहापूर येथे दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळाचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेत आरोग्य विभागातील विविध स्तरांवरील अधिकारी कर्मचाऱ्यांना आधुनिक प्राथमिक आरोग्य सेवा व्यवस्कोचे प्रशिक्षण देऊन ग्रामीण आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात आला.

नागरिकांना गुणवत्तापूर्ण, सुलभ आणि सर्वसमावेशक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, आरोग्य व कल्याण केंद्रांमार्फत दिल्या जाणाऱ्या सेवांची गुणवत्ता वाढविणे तसेच विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे हा प्रशिक्षणाचा प्रमुख उद्देश होता.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजीत महाले, जिल्हा माता व बाल बागोपन अधिकारी डॉ. निलिंद जाधव तसेच तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सरपाते यांत्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यशाळेत जिल्हा प्रशिक्षण केंद्राचे डॉ. निलेश जाधव व वैद्यकीय अधिकारी डॉ. अभय खरात यांच्यासह डॉ. शिवानंद शिंगाडे, डॉ. संतोष सांगळे, डॉ. शैलेश खंडारे, डॉ. जीवन भारती, सुवर्णा बेलसरे, स्वाती शेंडे, कविता खाहे, सुनिता जवंजाळ आणि सुलोचना पराड यांनी प्रशिक्षक म्हणून मार्गदर्शन केले. यावेळी विविध जिल्हास्तरीय कार्यक्रम अधिकारी तसेच आरोग्य विभागाचे अधिकारीज कर्मचारी उपस्थित होते. कार्यशाळेत वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, गटप्रवर्तक आणि आशा समन्वयक यांनी सहभाग

'कसं काय?' मोहिमेअंतर्गत ग्रामीण आरोग्य सेवा नोंदविला. त्यांना सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम, समुदाय आधारित आरोग्य सेवा, रुग्णाभिमुख सेवा वितरण, आरोग्य नौद बग्वस्थापन तसेच आरोग्य कल्याण केंद्रांच्या कार्यक्षम कार्यपद्धतीबाबत सखोल प्रशिक्षण देण्यात आले

प्रशिक्षणादरम्यान प्रत्यक्ष गृहभेटीवर विशेष भर देण्यात आला. उपकेंद्र स्तरावरील समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा कार्यकर्त्या आणि गटप्रवर्तक यांनी नागरिकांच्या घरी भेट देऊन प्राथमिक आरोग्य सेवाअंतर्गत समाविष्ट असलेल्या १४ आरोग्य सेवांची माहिती संकलित करणे, अशा सूचना देण्यात आल्या.

# स्मशानभूमीच्या प्रश्नावर सभागृहात आमदार खरातांचा प्रश्न मंत्री जयकुमार गोरे यांची स्वतंत्र धोरणाची ग्वाही

प्रतिनिधी ९ जुलै

**मेहकर :** पावसाळी अधिवेशनात स्मशानभूमीच्या प्रश्नावर आमदार सिद्धार्थ खरात यांनी सरकारला चांगलेच धारेवर धरत सभागृहात आक्रमक भूमिका घेतली. ७५ वर्षांनंतरही अनेक गावांमध्ये स्मशानभूमीसाठी जागा नसल्याचा मुद्दा त्यांनी ठामपणे मांडत, सरकारकडून स्पष्ट निर्णयाची मागणी केली. त्यांच्या आक्रमक सवालांनंतर ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी आवश्यक असल्यास जमीन अधिग्रहित करण्यासह स्वतंत्र धोरण तयार करण्याची ग्वाही सभागृहात दिली.

लक्षवेधीदरम्यान आमदार खरात यांनी सांगितले की, हिवाळी अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित केल्यानंतर शासनाने जीआर काढला; मात्र त्याची प्रभावी अंमलबजावणी झालेली नाही. आजही त्यांच्या मतदारसंघातील २० गावांपैकी ८ गावांमध्ये स्मशानभूमीसाठी जागाच उपलब्ध नसल्याने नागरिकांना अंत्यसंस्कारासाठी मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. जमीनच उपलब्ध नसलेल्या गावांचे नेमके काय? असा थेट सवाल करत आमदार खरात यांनी सरकारला कोंडीत पकडले. आवश्यक असल्यास खासगी जमीन अधिग्रहित करण्याचा निर्णय घेणार का? तसेच २५-१५ योजनेअंतर्गत मिशन मोडवर विशेष निधी देऊन राज्यातील स्मशानभूमीचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविणार का? असे दोन थेट प्रश्न त्यांनी मंत्री गोरे यांच्यासमोर ठेवले. आमदार खरात यांच्या मुद्देसूद मांडणीला उत्तर देताना मंत्री जयकुमार गोरे यांनी शासन या विषयावर सकारात्मक असल्याचे स्पष्ट केले. स्मशानभूमीसाठी स्वतंत्र धोरण तयार करण्याचे काम सुरू असून, गरज भासल्यास जमीन अधिग्रहित करण्याचाही निर्णय घेतला जाईल, अशी स्पष्ट ग्वाही त्यांनी दिली. याशिवाय, ज्या गावात स्मशानभूमीची सुविधा उपलब्ध नाही, त्या गावांमध्ये हा प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात येईल.

डीपीसी, २५-१५ तसेच शासनाच्या विविध योजनांमधून निधी उपलब्ध करून स्मशानभूमी उभारणीला प्राधान्य दिले जाईल, असेही मंत्री गोरे यांनी सभागृहात स्पष्ट केले. आमदार सिद्धार्थ खरात यांनी सातत्याने उपस्थित केलेल्या या प्रश्नामुळे सरकारला सभागृहात भूमिका स्पष्ट करावी लागली. त्यामुळे स्मशानभूमीविना असलेल्या गावांच्या प्रश्नावर शासनस्तरावर ठोस हालचाली होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# विद्यारंभ सोहळ्याने उजळले स्कूल ऑफ स्कॉलर्स

प्रतिनिधी ९ जुलै



**मलकापुर :** शहरातील स्व. सरदारमल मोहनलाल संचेती एज्युकेशनल अँड मल्टीपर्पज फाउंडेशन द्वारा संचलित स्कूल ऑफ स्कॉलर्स मलकापुर येथे ज्ञान, संस्कार आणि भारतीय परंपरेचा सुंदर संगम अनुभवायला मिळालेला विद्यारंभ संस्कार सोहळा अत्यंत भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. अध्यात्मिक वातावरण, वैदिक मंत्रोच्चार आणि पालकांच्या उत्स्फूर्त उपस्थितीमुळे संपूर्ण परिसर मंगलमय झाला.

कार्यक्रमाला संस्थेचे सचिव ॲड. अमर संचेती, संचालिका इंजि. सौ. ममता संचेती तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका प्रो. डॉ. सुदीप्ता सरकार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

विद्यारंभ संस्काराच्या माध्यमातून नर्सरीच्या चिमुकल्यांनी प्रथमच ज्ञानदेवतेचे स्मरण करत अक्षरलेखनास सुरुवात केली. पालकांच्या साक्षीने पार पडलेला हा अविस्मरणीय क्षण प्रत्येक कुटुंबासाठी भावनिक आणि आनंददायी ठरला. लहानग्यांच्या निरागस चेहऱ्यावरील आनंद आणि पालकांच्या डोळ्यांतील समाधानाने संपूर्ण सभागृह भारावून गेले.

यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत उत्तम संस्कार, चारित्र्य आणि मूल्याधिष्ठित जीवनाची शिकवण देण्याचे महत्त्व अधोरेखित केले. शालेय जीवनाची सुरुवात भारतीय संस्कृतीच्या पवित्र परंपरेतून होत असल्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला अशा उपक्रमांमुळे बळ मिळते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमात मोठ्या संख्येने पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. शाळेने केलेल्या सुबक नियोजनाचे आणि संस्कारप्रधान उपक्रमाचे उपस्थितांनी मनापासून कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व संपूर्ण शाळा परिवाराने परिश्रम घेतले.

भारतीय संस्कृतीची जपणूक, आधुनिक शिक्षणाची जोड आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याचा संकल्प यांचा सुंदर मिलाफ घडवून आणणारा हा विद्यारंभ संस्कार सोहळा उपस्थितांच्या स्मरणात कायमचा कोरला गेला.

## महसूल प्रशासनाचा अजब कारभार

# केंद्र सरकारला 'उल्लू' बनवण्याचा डाव ?

## गुढधी येथील 'घरकुल'च्या हक्काच्या जागेवर केंद्रीय विद्यालयाचा घाट

## तब्बल ३२ वर्षांनंतर आलेल्या नोटीसमुळे गोरगरीब लाभार्थ्यांमध्ये तीव्र असंतोष !

प्रतिनिधी ९ जुलै

**अकोला :** अकोला तालुक्यातील मौजे गुढधी येथील गरीब व गरजू लाभार्थ्यांना हक्काच्या घरासाठी (घरकुल) शासनाने वाटप केलेल्या भूखंडावर आता प्रशासनाने अचानक डोळा ठेवला आहे. या जागेवर केंद्रीय विद्यालय उभारण्याचा घाट घालत महसूल प्रशासनाने थेट केंद्र सरकारचीच दिशाभूल केल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे, ज्या जागेचा मोबदला लाभार्थ्यांनी १९९४ मध्येच शासनाकडे जमा केला आहे, ती जागा स्वतःच्या मालकीची असल्याचे सांगून प्रशासनाने केंद्रीय विद्यालयाला देण्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवला. या अजब कारभारामुळे संतप्त झालेल्या लाभार्थ्यांनी आता थेट महसूल विभागाविरोधात शड्डू ठोकला असून तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

मौजे गुढधी येथील गट क्र. १३३ अ/ब/क मधील २.०२ हे आर क्षेत्र हे मुळात घरकुल योजनेच्या गरीब व गरजू लाभार्थ्यांसाठी राखीव असून, ५ मे १९९४ रोजी तत्कालीन तहसीलदार यांच्या आदेशान्वये या भूखंडांचे रीतसर वाटप करण्यात आले होते. लाभार्थ्यांनी या जागेचा रीतसर मोबदला रक्कमही शासनाकडे जमा केली आहे. असे असतानाही, महसूल प्रशासनाने ८ जानेवारी २०२६ रोजी गावात अचानक एक जाहीरनामा लावून सदर जागा केंद्रीय विद्यालयासाठी मागवण्यात आल्याचे घोषित केले. या जाहीरनाम्यामुळे गरीब लाभार्थ्यांच्या पायाखालची जमीनच सरकली आहे.


### ३२ वर्षांनंतर जाग आली का ?

» ५ मे १९९४ रोजी भूखंड वाटपाचे आदेश झाले असताना आणि लाभार्थ्यांनी पैसे भरले असताना, गेली ३२ वर्षे प्रशासनाने लाभार्थ्यांना प्रत्यक्ष ताबा देऊन घरे का बांधू दिली नाहीत? आता इतक्या वर्षांनी नोटीस काढण्याचे कारण काय ?. अकोल्यात हक्काचे केंद्रीय विद्यालय व्हावे ही सर्वसामान्यांची इच्छा असताना, जाणीवपूर्वक वादात अडकलेली आणि गरिबांच्या हक्काची जागाच का निवडली गेली ? ही केंद्रीय विद्यालय रखडवण्यासाठी रचलेली अंतस्थ व्यूहरचना तर नाही ना ?. जी जागा कायदेशीररित्या लाभार्थ्यांच्या मालकीची आहे, ती जागा निर्विवाद असल्याचे भासवून प्रशासनाने केंद्र सरकारला अंधारात का ठेवले आणि त्यांना 'उल्लू' का बनवले ?. अशी चर्चा रंगली आहे.

### जागा परत घेण्याच्या नोटीसला लाभार्थ्यांचे चोख उत्तर

» या संदर्भात मौजे गुढधी येथील जानराव शामराव किर्तक, महादेव मनसाराम वानखडे, बळीराम गंगाराम वारोकार, नागेशराव वासुदेव गजभिये आणि दिपक तुकाराम ढवळे यांच्यासह अनेक लाभार्थ्यांनी ४ फेब्रुवारी २०२६ रोजी थेट तहसीलदार, अकोला यांना लेखी हरकत अर्ज सादर केला आहे. या हरकतीमध्ये त्यांनी स्पष्ट केले आहे की, सदर भूखंड हा लाभार्थ्यांच्या कायदेशीर मालकीचा असून त्या जागेवर केंद्रीय विद्यालयाला जागा देण्यास संपूर्ण गावकऱ्यांचा तीव्र विरोध आहे. या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, उपअधीक्षक भूमी अभिलेख, पंचायत समिती आणि अकोला महानगरपालिका आयुक्तांनाही सादर करण्यात आल्या आहेत.

## लवकरच वीना चिरफाड होणार मृतदेहांचे शव विच्छेदन



प्रतिनिधी ९ जुलै

**अकोला:** एखाद्याचा मृत्यू संशयास्पद असल्यास किंवा कोणाची हत्या झाल्यास त्या मृतदेहाचे शव विच्छेदन (पोस्टमार्टम) केले जाते. पोस्टमार्टम साठी डॉक्टर उपलब्ध नसल्यास अनेकदा तासन्तास वाट पहावी लागते. तसेच चिरफाड केल्यानंतर मृतदेह खराब होऊ नये म्हणून लवकरच अंतिम संस्कार केले जातात. मृतदेहाला आंघोळ सुद्धा घालता येत नाही. यावर उपाय म्हणून आता राज्यात मृतदेहांचे पोस्टमार्टम विना चिरफाड करता यावे यासाठी एक पायलट प्रोजेक्ट सुरू केला जाईल. मुंबईतील जे जे हॉस्पिटल आणि केई एम हॉस्पिटल मध्ये विना चिरफाड पोस्टमार्टम साठी पायलेट प्रोजेक्ट सुरू केला जाईल. यासाठी आवश्यक मशिनरी खरेदी करण्यासाठी टेंडर काढण्यात आले आहेत. येत्या दोन ते तीन महिन्यात जे जे हॉस्पिटल आणि केईएम हॉस्पिटल मध्ये विना चिरफाड शव विच्छेदन सुरू होईल. बुधवारी विधान परिषद मध्ये राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही माहिती दिली. त्यांनी म्हटले की मुंबईतील या दोन्ही हॉस्पिटल मधील प्रयोग सफल झाल्यानंतर संपूर्ण राज्यभरात विना चिरफाड मृतदेहांचे शवविच्छेदन करण्याची व्यवस्था केली जाईल. जगात 90 ते 95 टक्के मृतदेहांचे चिरफाड न करता शवविच्छेदन केले जाते. आता महाराष्ट्रात सुद्धा 90% शव विच्छेदन चिरफाड न करता केले जाईल. परंतु दहा टक्के पोस्टमार्टम विना चिरफाड आणि चिरफाड अशा दोन्हीही पद्धतीने केले जाईल. उदाहरणार्थ कोणाची हत्या झाल्यास किंवा एखाद्याचा मृत्यू संशयास्पद वाटल्यास पुरावे नष्ट होऊ नयेत याकरिता या मृतदेहांचे चिरफाड करून शव विच्छेदन केले जाईल. तसेच पोस्टमार्टम गृहांमध्ये कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी असल्याने त्यांची रिक्त पदे सुद्धा लवकरच भरली जातील.

## अशोक वाटिका चौकात एसटी बस अचानक बंद पडली

### बसेस मध्येच बंद पडण्याचे प्रकार काही केल्या थांबेना



प्रतिनिधी ९ जुलै

**अकोला :** एसटी महामंडळाच्या बसेस कुठेही बंद पडत आहेत. यामुळे प्रवाशांना मात्र नाहक त्रास सहन करावा लागतो आहे.

आज दुपारी अशोक वाटिका चौकात वाशीम अकोला बस अचानक बंद पडली. त्यामुळे प्रवाशांना मध्येच उतरून बसस्थानक अथवा आपल्या नियोजित ठिकाणी जावे लागले. यामुळे प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागतो. भंगार झालेल्या बसेस कालबाह्य ठरवण्याची गरज आहे. नाही तर प्रवाशांना नेहमीची डोकेदुखी होऊन जाईल. लालपरीने आता कात टाकण्या शिवाय गत्यंतर नाही. शहरात बस बंद पडली म्हणून बरे नाही तर प्रवाशांना अधिक हेलपाटे सहन करावे लागतात. बसमध्ये महिला, वृद्ध मोठ्या संख्येने असल्या तर त्यांची गैरसोय होते. आज दुपारी अकोला वाशीम बस अशोक वाटिका चौकात बंद पडली. त्यामुळे प्रवाशांना तेथेच उतरावे लागले. पाऊस सुरू असला तर अडचण अधिक होते.

## भर दिवसा 50 हजारांच्या शेळ्या पळविल्या!

### चोरीसाठी कारचा वापरः अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल

प्रतिनिधी ९ जुलै

**खामगाव :** शहरालगतच्या रावणटेकडी परिसरातील बायपास रोडवर भरदिवसा दोन अज्ञात चोरट्यांनी चार शेळ्या व एक पिल्लू लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. चोरीसाठी कारचा वापर करण्यात आला. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चोरीस गेलेल्या शेळ्या व पिल्लाची एकूण किंमत सुमारे ५० हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगल पांडुरंग बिचकुले (वय २४, रा. वरोडी, ता. मोताळा, जि. बुलढाणा) हे रावणटेकडी परिसरात झोपडी उभारून गेल्या काही महिन्यांपासून मेंढ्या-शेळ्यांचे पालन करीत आहेत. ६ जुलै रोजी सकाळी ९ वाजता त्यांच्या शेळ्या बायपास रोडलगत चरत असताना कारमधून आलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी चार शेळ्या व एक पिल्लू वाहनात टाकण्यास सुरुवात केली. ही बाब लक्षात येताच, फिर्यादींच्या वहिनी रेखाबाई पटू बिचकुले यांनी आरडाओरडा करत चोरट्यांच्या दिशेने धाव घेतली; मात्र चोरट्यांनी ५० हजार रुपये किमतीच्या चार शेळ्या व एक पिल्लू कारमध्ये टाकून घटनास्थळावरून पलायन केले. याप्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून शिवाजीनगर पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पुढील तपास पोलिस निरीक्षक सुरेंद्र अहिरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अंमलदार संदीप टाकसाळ करीत आहेत. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि अन्य तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## ताशे चोरणारा आरोपी अटकेत

प्रतिनिधी ९ जुलै




**अमरावती :** घरासमोरून ताशे चोरणारे आरोपी पोलिसांनी अटक केली आहे. 23/06/2026 रोजी फिर्यादी प्रसाद राजेंद्र जगताप वय 26 वर्ष रा. अंबापेठ मनिवाई गुजराती शाळेजवळ अमरावती यांनी रिपोर्ट दिला की त्याचे घराच्या समोरील खुल्या शेड मधे एकुण 9 ताशे ठेवले होते दि. 22/06/2026 रोजी फिर्यादी यांनी शेड मध्ये जाऊन पाहीले असता ठेवलेल्या ताशा पैकी 1 ताशा दिसुन आला व एकुण 8 ताशे दिसुन आले नाही मी आजु बाजु शोध घेतला असता मिळुन आले नाही, कोणीतरी अज्ञात इसमाने घराच्या शेड मधुन माझे 8 ताशे चोरुन नेले.

अशी फिर्यादीने पोस्टेला तक्रार दिल्यावरून आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याचा वरिष्ठाच्या मार्गदर्शना प्रमाणे तात्रीक बाबीच्या व गुप्त बातमी दाराकडुन प्राप्त झालेल्या माहीतीच्या आधारे सखोल तपास केला त्या प्रमाणे निष्पन्न बाबी नुसार गुन्ह्यातील आरोपी नामे संकेत अंगेश घोसले वय 19 वर्ष रा. राजुरा पारधी बेडा अमरावती यास ताब्यात घेउन विचारपुस केली असता त्याने वरिल प्रमाणेचा गुन्हा केला असल्याची कबुली दिली तसेच तपासा दरम्यान नमुद आरोपीता कडुन गुन्ह्यातील संपुर्ण मुद्देमाल एकुण 08 ताशे कि. अ. 48,000/ रु. चा माल जप्त करण्यात आला.

सदरची कार्यवाही पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त परीमंडळ 2 श्याम घुगे, स.पो.आ. राजापेठ विभाग, निलेश ब्राम्हणे, यांचे मार्गदर्शना खाली वरिष्ठ पोलीस रोशन शिरसाट, पोलीस निरिक्षक (गुन्हे) मंगला वाकडे, पो.उप.नि. तुषार गांवडे, पोउपनि रंगराव जाधव, पोहेकॉ. मंगेश भेलाये, पोहेकॉ. हरिष बुंदेले, नापोकॉ. प्रदीप राठोड, नापोकॉ. प्रमोद हरणे, पोकॉ. मंगेश दिघेकर, पोकों अथर बेग, निलेश कान्डंलकर, पोकों आकाश इंगोले, पोकों बाबुसींग राठोड, चालक, सपोउपनी. राजेश सदानशीवे, पोकॉ. आनंद जाधव यांनी केली.

## महागड्या खतांच्या गुणवत्तेचे काय, शेतकऱ्यांचा सवाल

प्रतिनिधी ९ जुलै

**अकोला :** सध्या खरीपाची पेरणी सुरू आहे. शेतकरी कृषी निविष्ठा, खते खरेदी करीत आहेत. महागडे खत विकत घेताना शेतकरी कासावीस होत आहेत. रॅकने आलेली खते गोदामातून मुख्य डिलर, उप डिलर आणि तेथून शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतात. परंतु बॅग वरील कंटेंट नुसार तपासणी कधीही होत नाही. त्यात बरेचदा शेतकरी फसवला जातो. या महत्त्वाच्या विषयाकडे शेतकरी जागर मंचाचे मनोज तायडे यांनी लक्ष वेधले आहे. कृषी विभागाकडे गुणवत्ता नियंत्रण यंत्रणा आहे.

त्या माध्यमातून तपासणी करता येऊ शकते. परंतु अगदी विश्वासावर वर्षानुवर्षे ही प्रक्रिया सुरू आहे. आणि मग त्यातून खताच्या पोत्यातून कधी माती, रेती निघाली अशी ओरड होते. पैसे मोजून शेतकरी फसवला जातो. अशा बाबी होऊ नये म्हणून दक्षता बाळगणे आवश्यक आहे. कारण ऐन हंगामात शेतकऱ्यांना कशा प्रकारे अडचणीत आणता येईल असे प्रयत्न होतात.

बियाणे, खते मिळवण्यासाठी कसरत करावी लागते. खतांचे दर वाढले आहे. 800-900 रुपयांना मिळणारी बॅग 1600-1800 रुपये देऊन घ्यावी लागत आहे. त्यामुळे शेतकरी फसवला जाणार नाही याकडे कृषी विभागाने लक्ष देणे आवश्यक आहे असे मनोज तायडे यांचे म्हणणे आहे.

## यवतमाळ जिल्ह्यात 9 व 10 जुलैला वादळी पावसाचा इशारा

### मुंबई वेधशाळेकडून 'यलो अलर्ट' जारी!

प्रतिनिधी ९ जुलै

**यवतमाळ:** उकाड्याने हैराण झालेल्या यवतमाळकरांसाठी हवामान खात्याकडून एक महत्त्वाची अपडेट आली आहे. मुंबई प्रादेशिक वेधशाळेने जाहीर केलेल्या ताज्या ५ दिवसांच्या हवामान अंदाजानुसार, यवतमाळ जिल्ह्यामध्ये ९ आणि १० जुलै रोजी विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्याला दोन दिवसांसाठी 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे.

वेधशाळेच्या अहवालानुसार, सुरुवातीचे दोन दिवस (७ आणि ८ जुलै) यवतमाळ जिल्ह्यात पावसाचा कोणताही तीव्र इशारा नसला, तरी आठवड्याच्या उत्तरार्धात हवामानात मोठा बदल होणार आहे. ९ जुलै रोजी जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यासह पाऊस हजेरी लावेल. या दिवशी जिल्ह्यासाठी 'यलो अलर्ट' जाहीर करण्यात आला आहे. यवतमाळसोबतच शेजारील चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांतही असाच अंदाज आहे.

१० जुलै रोजी शुक्रवारीही जिल्ह्यात पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता असून, सलग दुसऱ्या दिवशी 'यलो अलर्ट' कायम ठेवण्यात आला आहे. या दिवशी वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली या विदर्भातील इतर जिल्ह्यांमध्येही विजांचा कडकडाट पाहायला मिळू शकतो.

विदर्भातील इतर जिल्ह्यांची स्थिती काय?

यवतमाळव्यतिरिक्त विदर्भातील इतर जिल्ह्यांमध्येही पुढील ५ दिवसांत पावसाची वेगवेगळी स्थिती असेल: ११ जुलै रोजी अमरावती, वर्धा, नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. ९ आणि १० जुलै दरम्यान विजा कडकडत असताना नागरिकांनी, विशेषतः शेतकरी बांधवांनी आणि शेतात काम करणाऱ्या मजुरांनी झाडांचा आश्रय घेणे टाळावे. तसेच विजेच्या उपकरणांपासून दूर राहावे आणि सुरक्षित स्थळी आश्रय घ्यावा, असे आवाहन हवामान विभागाने केले आहे.

## पुण्या मुंबईत पावसाचे थैमान, घोर मात्र जिल्ह्यातील ग्रामीण परिसरातील नागरिकांना

प्रतिनिधी ९ जुलै



**अकोला:** मुंबई पुणे आणि नाशिक परिसरात पावसाने थैमान घातले आहे. मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाल्याच्या तसेच जागोजागी नदी नाल्यांना आलेले पुर, तसेच घरांमध्ये पाणी घुसल्याच्या बातम्या टीव्ही आणि वर्तमानपत्रात झळकत असतानाच, अकोला जिल्ह्यातील ग्रामीण भागात मात्र नातेवाईकांच्या सुरक्षिततेची चिंता वाढली आहे. अकोला शहर तसेच ग्रामीण भागातील अनेक सुशिक्षित बेरोजगार तसेच परिवार नोकरी व्यवसाय आणि शिक्षणासाठी मुंबई पुण्यात स्थायिक झाले आहेत. या मुसळधार पाऊस आणि पुरापासून आपले आप्तस्वकीय सुरक्षित आहेत का? ही विचारपूस करण्यासाठी ग्रामीण भागातून सातत्याने फोन केले जात असून तुम्ही सुरक्षित आहात ना? हा एकच प्रश्न प्रत्येक संभाषणाचा केंद्रबिंदू ठरत आहे .पावसाच्या संकटाच्या पार्श्वभूमीवर गाव आणि शहर यांच्यातील भावनिक नात्याचा जिव्हाळा पुन्हा एकदा अधोरेखित होत आहे. मुंबई पुण्यात कोसळणाऱ्या पावसामुळे जरी अकोला जिल्ह्यात प्रत्यक्ष परिणाम झाला नसला तरी तेथे राहणाऱ्या नातेवाईकांच्या सुरक्षिततेसाठी गावाकडून व्यक्त होत असलेली काळजी आणि मायेची ओढ या फोनच्या रिंगटोनच्या माध्यमातून प्रकर्षाने जाणवत आहे.

### पुण्या मुंबईतील नातेवाईकांशी संवाद

» दादा वहिनी घराबाहेर पडू नका,,, काका घराबाहेर पाणी जास्त असेल तर घराबाहेर जाऊ नका, मुलांची काळजी घ्या, अशा सूचना आणि काळजी व्यक्त करणारे संवाद सध्या ग्रामीण परिसरातील प्रत्येक घरात ऐकायला मिळत आहेत. ज्येष्ठ नागरिक आणि महिलांमध्ये विशेषतः अधिक चिंता दिसून येत आहे. मुंबई पुण्यात अनेक ठिकाणी पाणी साचणे, वाहतुकीवर परिणाम होणे, काही भागातील शाळांना सुट्ट्या जाहीर होणे अशा बातम्या टीव्ही आणि वर्तमानपत्र तसेच सोशल मीडियातून समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर अकोला जिल्ह्यातील ग्रामीण परिसरातील अनेक कुटुंबांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. सकाळपासूनच ग्रामीण परिसरातील नागरिक आपल्या नातेवाईकांची फोन करून परिस्थितीची माहिती घेत आहेत. एकंदरीतच पूर पुण्या मुंबईत परंतु घोर मात्र जिल्ह्यातील ग्रामीण परिसरातील नागरिकांना पडला आहे

## शरद सारडा यांना दोन प्रकरणांत सश्रम कारावास

प्रतिनिधी ९ जुलै

**अकोला :** जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या आदेशाची अखेर अंमलबजावणी करण्यात आली. सारडा ऑईल इंडस्ट्रीज व मारोती उद्योगचे भागीदार शरद रामपाल सारडा यांना दोन स्वतंत्र प्रकरणांत प्रत्येकी एक वर्ष सश्रम कारावास व प्रत्येकी १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली होती. या शिक्षेची अंगलबजावणी करत पोलिसांनी ६ जुलै २०२६ रोजी त्यांना अटक करून तुरुंगात रवानगी केली. प्राप्त गाहितीनुसार, तारा कमलकिशोर अग्रवाल विरुद्ध सारडा ऑईल इंडस्ट्रीज तसेच कमलकिशोर अग्रवाल विरुद्ध श्री मारोती उद्योग या ग्राहक तक्रारींमध्ये जिल्हा आयोगाने घेतली गंभीर दखल. या प्रकरणात शिक्षा सुनावल्यानंतरही आरोपीवर तातडीने कारवाई होत नसल्याने पोलीस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. आरोपी गावात वावरत असल्याचा दावा असतानाही अटक होत नसल्याने आयोगाने याची गंभीर दखल घेत पोलीस अधीक्षकांना कारणे दाखवा नोटीस बजावली. ग्राहक तक्रार निवारण आयोगाने तक्रारदारांच्या बाजूने निर्णय दिला होता. आयोगाने संबंधित उद्योग व त्यांच्या भागीदारांना तक्रारदारांना १ लाख रुपये, त्यावर १ एप्रिल २०१७ पासून वार्षिक ८ टक्के व्याज, तसेच मानसिक, शारीरिक व आर्थिक त्रासापोटी ५ हजार रुपये नुकसानभरपाई आणि 3 हजार रुपये खर्च देण्याचे आदेश दिले होते. मात्र, आयोगाच्या स्पष्ट आदेशानंतरही संबंधितांनी आदेशाचे पालन न केल्याने तक्रारदारांनी अवमान याचिका क्रमांक दाखल केली. या याचिकांवर ४ नोव्हेंबर २०२५ रोजी निर्णय देताना जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष श्रीपाद कुळकर्णी तसेच सदस्य नितीन के. अग्रवाल आणि निलीमा बेलोकर यांनी आयोगाच्या कठोर भूमिकेनंतर पोलीस प्रशासनाने हालचाल करत ६ जुलै रोजी शरद रामपाल सारडा यांना अटक करून तुरुंगात रवानगी केली. त्यामुळे ग्राहक आयोगाच्या आदेशाची अखेर प्रभावी अंमलबजावणी झाल्याचे स्पष्ट झाले आहे. शरद सारडा यांना दोन्ही प्रकरणांत प्रत्येकी एक वर्ष सश्रम कारावास, प्रत्येकी १० हजार रुपये दंड, तसेच दंड न भरल्यास दोन महिन्यांच्या अतिरिक्त कारावासाची शिक्षा सुनावली. या संपूर्ण प्रकरणात तक्रारदारांच्या वतीने अॅड. मनोज अग्रवाल यांनी कामकाज पाहिले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135